# अनुसुचित जाती प्रवर्गाच्या वर्गीकरणाचा अहवाल नेमलेल्या आयोगाने त्वरित करावा ! आमदार नरेंद्र भोंडेकर




**महासागर प्रतिनिधी,**

**नागपूर, दि. १९ :** हिंदु बहुजन महासंघाचे राज्यातील सर्व विभाग, जिल्हा व तालुक्यांचे पदाधिकारी, एस.सी., एस.टी. व ओ.बी.सी. समाजांचे प्रमुख यांची राज्यस्तरीय बैठक महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा भंडारा विधानसभा क्षेत्राचे आमदार नरेंद्र भोंडेकर यांच्या अध्यक्षतेत रामटेक क्षेत्राचे माजी खासदार तथा विधान परिषदेचे आमदार कृपाल तुमाणे, अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष चरणसिंग टाक, लहुजी शक्ती सेना प्रदेशाध्यक्ष कैलास खंडारे, युवा आघाडी प्रदेशाध्यक्ष सचिन क्षिरसागर, महिला प्रमुख भारतीताई कांबळे, सफाई कामगार सेना प्रदेशाध्यक्ष रमेश तोंडीलायता (बुलढाणा), क्रांतीवीर लहुजी शक्ती सेना संस्थापक अध्यक्ष शंकरराव तडाखे (पुणे), ओ.बी.सी.चे सुरेश धुर्वे यांच्या प्रमुख उपस्थितीत रविभवन सभागृह, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे नुकतीच संपन्न झाली.

अनुसूचित जाती या प्रवगार्चे अ, ब, क, ड असे वर्गीकरण व हिंदू मागासवर्गीय समाजांच्या विविध मागण्यांसाठी महासंघ मागील ब?याच वर्षांपासून शासनाकडे पाठपुरावा करीत आहे. मा. सुप्रीम कोटार्ने १ ऑगस्ट २०२४ रोजी अनुसूचित जाती या प्रवगार्चे वर्गीकरण करण्याच्या दिलेल्या निर्णयानुसार त्यांनी वर्गीकरण करण्याची जबाबदारी राज्य सरकारकडे सोपविली आहे. त्यानुसार राज्य शासनाने निवृत्त न्यायाधीश एक सदस्यीय आयोगाची नेमणूक केली आहे. परंतु सदर आयोगासाठी शासनाकडून कार्यालय, कर्मचारी व आवश्यक गोष्टी दिल्याचे आढळून येत नाही.

हिंदु बहुजन महासंघाच्या या बैठकीमध्ये सदर आयोगाच्या होत असलेल्या विलंबाबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली. आमदार नरेंद्र भोंडेकर व महासंघाचे राष्ट्रीय संयोजक आमदार कृपाल तुमाणे यांनी आपल्या भाषणांद्वारे सांगितले की, अनुसूचित जाती प्रवगार्चे वर्गीकरण इतर दोन राज्यांनी केल्यानुसार महाराष्ट्र राज्याने सुद्धा त्वरित करावे, नेमलेल्या एक सदस्यीय आयोगाने हिंदु मागासवर्गीय समाजाच्या विकासाचा समतोल राखण्यासाठी आवश्यक अभ्यास करून अहवाल शासनास त्वरित सादर करावा. जर या कामासाठी उशीर झाल्यास महासंघाकडून राज्यभर दौरे, ठिकठिकाणी बैठकांचे आयोजन, आयोजनांद्वारे जागृती करून येत्या बजेट अधिवेशनाच्या वेळी, नागपूर ते मुंबई मार्च आंदोलन करून मुंबई येथे भव्य मोचार्चे आयोजन करण्यात येणार आहे, असा इशारा देण्यात आला आहे. बैठकीत उपस्थित चरणसिंग टाक, कैलास खंडारे, शंकरराव तडाखे, रमेश तोंडीलायत, मातंग एकीकरण समितीचे प्रदेशाध्यक्ष बुधाजी सुरकर यांनी या आंदोलन मार्च व मोचार्साठी आपला पाठिंबा दर्शविला आहे.

या बैठकीच्या आयोजनासाठी भैय्यासाहेब बिघाणे, जयसिंग कछवाह, शंकरराव वानखेडे, विशाल लारोकर, भारतीताई कांबळे, फकीरा खडसे, रामचंद्र दावलवर, भगवान वैरागर, चंद्रकांत वानखेडे, अरविंद डोंगरे, पंजाबराव सोनेकर, राजेंद्र अडागळे, मुकेश घिचरे, शामराव सरोदे, रमेश सटवे, राजू मोहबे, राम अहिरवार, अनेश चवरे, विठ्ठलराव भुजबळ, प्रभुदास तायवाडे, पंजाबराव कावळे, जगदीश बोरकर, रोशन माहुरकर, सुभाष काकडे यांनी परिश्रम घेतले. संचालन प्रकाश चमके यांनी व आभार प्रदर्शन प्रा.डॉ.अशोक थोटे यांनी केले. बैठकीनंतर स्नेहभोजनाची त्यवस्था करण्यात आली.

# भांडेवाडी डम्पिंग यार्ड येथे संपूर्ण ५४ एकर जागा मोकळी

## नागपूर महानगरपालिकेद्वारे अंदाजे १० लाख मेट्रिक टन घनकचऱ्यावर बायोमायनिंग करण्यात आले



**महासागर प्रतिनिधी,**

**नागपूर, दि. १९ :** प्रत्येक शहरामध्ये नियमानुसार विकास आराखड्यात घनकचरा व्यवस्थापनाकरीता जागा राखीव असते. महाराष्ट्र प्रदूषण मंडळाच्या मान्यतेनुसार नागपुरातील भांडेवाडी मधील जागा कचरा डम्पिंगसाठी व कचरा प्रक्रियेसाठी सुनिश्चित केली गेली आहे. येथे शहरातील संपूर्ण कच?याचे संकलन करून त्या कच?याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी व तेथील जागा स्वच्छ आणि मोकळी राहावी याकरिता नागपूर महानगरपालिकेद्वारे भांडेवाडी डम्पिंग यार्ड येथे बायोमायनिंग प्रकल्प राबविला जात आहे. नागपूर महानगरपालीकेकडून आत्तापर्यंत जुन्या २० लक्ष मेट्रिक टन कच?यावर प्रक्रिया करण्यात आलेली आहे. भांडेवाडी बिडगांव रोड येथील ५४ एकर जागा सन २०१४ पर्यंत ही कचऱ्याने संपूर्ण भरलेली होती तेथे प्रक्रिया न झालेला कचरा साठवून ठेवण्यात आला होता. नागपूर महानगरपालिकेने स्वखचार्ने या कचऱ्यावर बायोमायनिंग चा प्रकल्प राबविला व संपूर्ण ५४ एकर जागा मोकळी केली. शहरात स्वच्छता राहावी व साचलेल्या कचऱ्याची प्रक्रिया करून त्याची विल्हेवाट लावावी याकरिता नागपूर महानगरपालिकेकडून सतत प्रयत्न केले जातात. भांडेवाडी डम्पिंग यार्ड येथे दोन जागेवर (५५ एकर जागा आणि दुसरी ५४ एकर जागा) कचरा साठवण्यात येत होता. ५५ एकर जागा आणि एकर जागा ही जुन्या कचऱ्याने संपूर्ण भरलेली होती. प्रक्रिया न झालेला कचरा साठवून ठेवण्यात आला होता. ५४ एकर जागेवर अंदाजे १० लाख मेट्रिक टन जुना घनकचरा जमा होता. ही संपूर्ण जागा स्वच्छ आणि मोकळी व्हावी याकरिता नागपूर महानगरपालिकेने या कचऱ्यावर स्वखचार्ने बायोमायनिंग चा प्रकल्प राबविला. नंतर नागपूर महानगरपालिकेने या कचऱ्यावर बायोमायनिंग करून संपूर्ण परिसर फेब्रुवारी २०२१ ला मोकळा केला गेला. या ५४ एकर जागेवर सध्या नागपूर महानगरपालिकेने विविध पर्यावरण प्रकल्प राबविले आहे. जसे बांधकाम आणि पाडाव कचरा प्रक्रिया केंद्र , वेस्ट टू एनर्जी अंतर्गत १००० मेट्रिक टन प्रतिदिन क्षमतेचे सीबीजी प्लँन्ट उभारणे, एसएलएफचे बांधकाम, मियावाकी पर्यावरणीय प्रकल्प इत्यादी, यापैकी काही प्रकल्प पूर्ण झाले असून उर्वरित प्रकल्पाचे बांधकाम कार्य सुरु झाले आहे त्याकरिता जागा सुनिश्चित करण्यात आली आहे, ही माहिती अधिक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी यांनी दिली. त्याचबरोबर भांडेवाडी डम्पिंग यार्ड येथील एकर जागेवर एसएलएफ मध्ये साचलेल्या २१.३० . लक्ष टन कचऱ्याचे सुद्धा बायोमायनिंग करून तो संपूर्ण परिसर रिकामा करण्याचे कार्य प्रगतीपथावर आहे. आजपर्यंत लाख टन जुन्या कचऱ्यावर प्रक्रिया करून सुमारे १५ एकर जागा मोकळी करण्यात आली आहे. हे काम वर्ष २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचा मनपाचा मानस आहे. त्यामुळे अंदाजे एकर जागा मोकळी होऊन त्या जागेवर पुन्हा नवीन पर्यावरणीय प्रकल्प राबविण्यात येऊ शकतील.नागपूर शहरात दैनंदिन १३००-१४०० टन घनकचऱ्याची निर्मिती होते. राबविण्यात येणाऱ्या पर्यावरणीय प्रकल्पांमुळे आजूबाजूच्या परिसरावर होणारे प्रदूषण बऱ्याच अंशी कमी होईल व लोकांना देखील दिलासा मिळेल. नागपूर महानगरपालिकेद्वारे भांडेवाडी येथे मियावाकी पद्धतीने ५००० चौरस मीटरमध्ये १५,५००, झाडे लावण्यात आली आहे. शहरात स्वच्छता राहावी व पर्यावरण शुद्ध राहावे याकरिता नागपूर महानगरपालिकेकडून सतत प्रयत्न केले जात आहेत.

# उभारते सितारा'मध्ये 'सुखाचा उत्सव'



**महासागर प्रतिनिधी,**

**नागपूर, दि. १९ :** इमर्जिंग स्टार्स फोरमच्या माध्यमातून निस्वार्थी आणि खूप चांगले काम करणाऱ्या विदर्भ हिंदी साहित्य संमेलन संस्थेचे मी कौतुक करतो. मला त्याचे कौतुक वाटते.आणि मी सर्व पालकांना सांगू इच्छितो की मुले स्वभावाने खूप खेळकर असतात.सर्व मुलांमध्ये क्षमता असते. त्यामुळे मुलांवर तुमची इच्छा लादू नका, त्यांना आधार द्या. प्रत्येक व्यक्तीची स्वत:ची वेगळी ओळख असते. म्हणून, खेळ, गायन, नृत्य इत्यादींच्या आवडीनुसार त्यांना समर्थन आणि प्रोत्साहन द्या.आजकाल मुलांच्या मोबाईलमुळे संपूर्ण जग त्यांच्या हातात आहे. त्यांना सर्वत्र ज्ञान सहज उपलब्ध होते. त्यांना काय बनायचे आहे, त्यांना काय करायचे आहे, ही मुले मोठी झाल्यावर स्वत:चा मार्ग शोधतात.म्हणूनच मुलांना आधार द्यावा असे मत निशांत सौदागर यांनी ही कल्पना मुलांमध्ये आणि त्यांच्या पालकांमध्ये मांडली. 'उभारते सितारे' हा नवोदित कलागुणांना वाव देण्यासाठी समर्पित विदर्भ हिंदी साहित्य संमेलनाचा लोकप्रिय उपक्रम. त्याअंतर्गत 'फेस्टिव्हल ऑफ हॅपीनेस' या थीमवर माहितीपूर्ण आणि मनोरंजक संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून आंतरराष्ट्रीय ऊर्जा प्रकल्प व्यवस्थापन अभियंता निशांत सौदागर उपस्थित होते.समन्वयक युवराज चौधरी यांनी स्वागत वस्त्र व स्मृतीचिन्ह देऊन त्यांचा गौरव केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना सहसंयोजक वैशाली मदारे यांनी आनंदाचा सण उदाहरणांसह सविस्तर सांगितला. त्यानंतर मुलांनीही या विषयावर आपल्या नृत्य आणि गाण्याने सर्वांची मने जिंकली.ज्यामध्ये बागल, पवन मेश्राम, राम बागल आणि भव्य अरोरा यांनी सुरेख गाणी सादर केली.खुशबू दुपारेच्या नृत्याने सर्वांनाच भुरळ घातली. हुशार मुलांच्या सादरीकरणाला पालकांनी तसेच कृष्णा कपूर, मीनाक्षी केसरवानी, दिलीप ढोरे, दीपक भावे, निर्मला खुराना, वेदप्रकाश अरोरा आदींनी भरभरून दाद दिली. प्रशांत शंभरकर यांनी कार्यक्रमात सहकार्य केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सहसंयोजक वैशाली मदारे यांनी केले. तर संयोजक युवराज चौधरी यांनी उपस्थित सर्व प्रेक्षक, पालक आणि कलाकारांचे आभार मानले.

# पृथा भुडे, अवी झपाटे ला सुवर्ण पदक

## खासदार क्रीडा महोत्सव तायक्कांडो स्पर्धा

**नागपूर.** केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या खासदार क्रीडा महोत्सवातील तायक्कांडो स्पर्धेमध्ये पृथा भुडे व अवी झपाटे यांनी १४ वषार्खालील मुली आणि मुलांच्या गटात सुवर्ण पदक पटकाविले. विवेकानंद नगर क्रीडा संकुल येथे ही स्पर्धा पार पडली.

स्पर्धेमध्ये १४ वषार्खालील मुले आणि मुलींच्या विविध वजनगटात स्पर्धा घेण्यात आली. मुलींच्या ५४ किलोवरील वजनगटात यूटीडब्ल्यूच्या पृथा भुडे ने सुवर्ण, यूटीडब्ल्यूच्या आरुषी राज ने रौप्य आणि सावनेर च्या नियती जांगडे ने कांस्य पदक पटकाविले. मुलांच्या ६५ किलोवरील वजनगटामध्ये आदर्श कॉन्व्हेंटच्या अवी झपाटे ने इटीए च्या श्रेयश पिंपळे नमवून सुवर्ण पदकावर मोहोर उमटविली.

श्रेयश ला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले.

# सप्तखंजेरी किर्तनातून महिलांना दिला संदेश

### वाण म्हणून वाटा विचारवंतांचे साहित्य

**महासागर प्रतिनिधी,**

**नागपूर, दि. १९ :** नरसाळा रोड, बेलदारनगर येथे स्वर्गीय आशा झाडे,स्वर्गीय-सचिन चोपडे,स्वर्गीय-मृण्मयी चोपडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विशेष कार्यक्रमआयोजित करण्यात आला होता. याच कार्यक्रमात सप्तखंजेरी वादक, बाल प्रबोधनकार,ग्रामगीता प्रचारक वेदांती मुळेकर ?यांनी आपल्या प्रबोधनात्मक किर्तनातून महिलांना संदेश दिला की, सध्या मकसंक्रांतीचे हळदीकुंकू कार्यक्रम मोठ्या आनंदात केल्या जातात. यावेळी सौभाग्य वाण देण्याची प्रथा आहे. इतर वस्तू वाण न देता,सावित्रीबाई फुले, जिजाई, रमाई, झाशीची राणी,अहिल्याबाई होळकर यांची पुस्तकं देण्यात यावी. समाजाला आज यांच्या विचारांची अत्यंत गरज आहे. जी मनाला आनंद देते हीच खरी भक्ती आहे आणि भक्ती हाच मुक्तीचा मार्ग असल्याचे प्रतिपादन वेदांती मुळेकर यांनी आपल्या प्रबोधनात्मक किर्तनातून केले. याप्रसंगी त्यांनी युवकांना देखील मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख पाहुणे सुरेशचंद्र चकोले,अशोक भुते,रमेश मेहर,गीता दांडेकर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रशेखर झाडे यांनी केले तर आभार प्रीती चोपडे यांनी मानले. कार्यक्रमाचे आयोजन चंद्रशेखर झाडे, प्रीती चोपडे,गौरव झाडे,प्रज्ञा झाडे यांनी केले.सप्तखंजेरी किर्तनामध्ये आशा चकोले,शशी भुते,स्नेहा चकोले,भगतसिंग ठाकुर,स्वप्नील चकोले,आनंद पाटील,मुरलीधर ढोबळे,तन्मय पाटील,गणेश चव्हाण यांनी परिश्रम घेतले. २१ जानेवारीला सकाळी ११ वा?जता.ह.भ.प संतोष महाराज ठाकरे यांचे गोपाळकाला किर्तन व दुपारी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

# तबला वादन, शास्त्रीय गायनाची अनुभूती

### ताल साधना समूहाचा उपक्रम

### ह्यताल-उत्सवह्ला रसिकांची उत्स्फूर्त दाद



**महासागर प्रतिनिधी,**

**नागपूर, दि. १९ :** ताल साधना समूह संस्थेद्वारे सुप्रसिद्ध तबलावादक पंडित प्रभाकर देसाई स्मृतीनिमित्त रविवारी ह्यताल उत्सवह्चे आयोजन करण्यात आले. यात ख्यातकीर्त कलाकारांनी ताल अर्पण अंतर्गत सादर केलेले तबला वादन, सीमा दामले यांचे शास्त्रीय गायन आणि पुण्याचे सुप्रीत देशपांडे यांचे सोलो तबलावादन यांच्या सुरावटीने सभागृहातील रसिकांना मंत्रमुग्ध तर केले. यासोबत संगीत क्षेत्रातील सर्व प्रकारांच्या फ्यूजनची अनुभूती प्रदान केली. दि ब्लाईंड रिलिफ असोसिएशनच्या ज्युबिली हॉलमध्ये रविवारी आयोजित कार्यक्रमात नागपुरातील सुरिचित तबला वादक दीपक खिरवडकर, राजू गुजर, विनय लातूरकर, श्रीकांत देसाई, रवि सातफळे, अतिथी कलाकार सुप्रीत देशपांडे आदी मान्यवर उपस्थित होते. यांच्या हस्ते कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन ला ने झाली सोबत विद्या बोरकर यांनी सरस्वती स्तवन सादर केले,यानंतर स्व. पं. प्रभाकर देसाई, तसेच तबलावादक पद्मविभूषण उस्ताद झाकीर हुसेन आणि विदभार्तील युवा तबलावादक आकाश चांदूरकर यांना मौन श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सुरुवात विनय ढोक व मोरेश्वर दहासहस्र यांचे शिष्य अथर्व शेष, वेद ढोक, अथर्व टेकाडे, शार्दूल डोंगरे, श्रेयश मुंजे यांच्या सामूहिक तबलावादनाने झाली. त्यांनी पेशकार, कायदा आणि बंदिशी सादर केल्या. त्यांना विनय ढोक यांनी लहरा संगत केली. त्यांच्या सामूहिक तबलावादनाने श्रोत्यांना खिळवून ठेवले. यानंतर सुप्रसिद्ध गायिका सीमा दामले यांनी भूप रागातील ह्यगुरू सात पाये सतगुरूह्ल ही झपताल मध्यलयीत आणि तीनतालात ह्यसहेलारे आ मिल गएह्ल ही बंदीश सादर केली. यानंतर त्यांनी दृततालात तराणा सादर केला. तसेच, संगीत स्वयंवरमधील ह्यमम आत्मा गमनाह्ल हे नाट्यगीत सादर करून रसिकांची मने जिंकली. त्यांना तबल्यावर वेद ढोक व हार्मोनियमवर आर्य पुराणकर यांनी उत्तम साथ दिली. कार्यक्रमाचा समारोप पुण्याचे प्रसिद्ध तबलावादक सुप्रीत देशपांडे यांच्या सोलो तबलावादनाने झाला. यांनी पारंपरिक पेशकार.. कायदा.. रेला सादर करून.. घराणेदार बंदिशी.. गती पेश केल्या त्यांना गोविंद गडीकर यांनी लहरा संगत केली. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध निवेदिका श्वेता शेलगावकर यांनी आपल्या निवेदनाने श्रोत्यांना खिळवून ठेवले. या

# अमेय गुप्ता, तृप्ती वाडकर सायकलिंगमध्ये अव्वल

### खासदार क्रीडा महोत्सव : विदर्भस्तरीय सायकलिंग स्पर्धा



**महासागर प्रतिनिधी,**

**नागपूर, दि. १९ :** केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या खासदार क्रीडा महोत्सवातील सायकलिंग स्पर्धेमध्ये अमेय गुप्ता आणि तृप्ती वाडकर मुले आणि मुलींमध्ये अव्वल ठरले. रविवारी (ता.१४) दीक्षाभूमी जवळील साहित्यभूषण अण्णाभाऊ साठे चौकातून सायकलिंग स्पधेर्ला सुरूवात झाली.

१४वषार्खालील मुलांच्या २१ अंतराच्या सायकलिंग स्पर्धेमध्ये जैन इंटरनॅशनल स्कूलच्या अमेय गुप्ता (३२.३०.१२..) ने प्रथम स्थान प्राप्त करीत सुवर्ण पदक पटकाविले. सेवा सदनच्या विनय इढोने (३३.५१.४४..) ने दुसरे तर श्रेयस उपरवत (४.०४.२८..) ने तिसे स्थान प्राप्त केले. १४ वषार्खालील मुलींच्या ११ किमी अंतराच्या स्पर्धेमध्ये जय ॲथिलेटिक्सच्या तृप्ती वाडकर (२३.३८.६४..) ने बाजी मारली. दिल्ली पब्लिक स्कूलची आदित्री पयासी (२३.४१.४१..) अवघ्या तीन सेकंदाने दुसऱ्या स्थानावर राहिली तर आदर्श सोनी (२८.४६.३०..)ला तिसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले.

१५ वषार्खालील मुलांच्या ११ किमी अंतराच्या स्पर्धेमध्ये जे.सी.एस.एस.च्या स्मित दशपुते (१४.१३.७८..) ने पहिले, आर.एस. मुंडले च्या मयंक काकडे (२०.२१.४०..)ने दुसरे आणि आर्यन समर्थ (२०.२८.३४..)ने तिसरे स्थान पटकाविले. वषार्खालील मुलींच्या किमी अंतराच्या स्पर्धेमध्ये सेवा सदनची मृण्मयी अनीवाल (१७.३१.५८..) पहिली आली.

बी.आर.मुंडले ची अवंती मोरे (१८.५०.५१..) दुसऱ्या आणि नेताजी सुभाषचंद्र बोस ची श्रेया ढोले (१४.०५.३१..) तिसऱ्या स्थानावर राहिली.

१२वषार्खालील मुलांच्या ८ किमी अंतराच्या स्पर्धेमध्ये सेंट जॉनच्या परमवीर सिंग २०.१४.३८(..) ने सुवर्ण, सेंट विसेंटच्या अथर्व रोकडे (२०.४१.८४..) ने रौप्य आणि विराज ढमढेर (२१.५३.७५..)ने कांस्य पदक पटकाविले. १२ वषार्खालील मुलींच्या किमी अंतराच्या स्पर्धेत क्रिशम स्कूलच्या श्लोका वैद्य (१४.१४.०८..)ने प्रथम, एसओएस च्या सौम्या खोडे (१६.१५.४४..)ने द्वितीय व महाराष्ट्र सायकल पोलो च्या सिमरन उमक (१६.३४.४५..) तृतीय क्रमांक पटकाविला.

माजी खासदार डॉ. विकास महात्मे, श्री. जयप्रकाश गुप्ता, माजी नगरसेविका प्रगती पाटील यांनी स्पधेर्ला हिरवी झेंडी दाखविली. विजेत्यांना भारतीय जनता पाटीर्चे विदर्भ संगठन मंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर, प्रदेश उपाध्यक्ष श्री. संजय भेंडे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी खासदार क्रीडा महोत्सवाचे सचिव डॉ. पीयूष आंबुलकर, सचिन देशमुख, प्रकाश चांद्रायण आशिष पाठक, सतीश सिरसवान उपस्थित होते.

**सायकलिंग निकाल (प्रथम, द्वितीय व तृतीय)**

१४ वषार्खालील मुले -१ किमी अमेय गुप्ता (जैन इंटरनॅशनल स्कूल)३२.३०.१२ .., विनय इढोने (सेवा सदन)३३.५१.४४ .., श्रेयस उपरवत ३४.०४.२८..

**१४वषार्खालील मुली -११ किमी**

तृप्ती वाडकर (जय ॲटथलेटिक्स) २३.., आदित्री पयासी (दिल्ली पब्लिक स्कूल) .., आदर्श सोनी ..

**वषार्खालील मुले -किमी**

स्मित दशपुते (जे.सी.एस.एस.) १४.१३.७८.., मयंक काकडे (आर.एस. मुंडले) २०.२१.४०.., आर्यन समर्थ २०.२८.३४..

१५वषार्खालील मुली -८ किमी

मृण्मयी अनीवाल (सेवा सदन) १७.३१.५८.., अवंती मोरे (बी.आर.मुंडले) १८.५०.५१.., श्रेया ढोले (नेताजी सुभाषचंद्र बोस) ..१४.०५.३१

**१२ वषार्खालील मुले -८ किमी**

परमवीर सिंग (सेंट जॉन)२०.१४.३८ .., अथर्व रोकडे (सेंट विसेंट) २०.४१.८४.., विराज ढमढेर २१.५३.७५..

**१२वषार्खालील मुली -५ किमी**

श्लोका वैद्य (क्रिशम स्कूल) १४.१४.०८.., सौम्या खोडे (एसओएस)१६.१५.४४ .., सिमरन उमक (महाराष्ट्र सायकल पोलो) १५.३४.४५..

# श्रीमती बिंझाणी महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम

**महासागर प्रतिनिधी,**

**नागपूर, दि. १९ :** श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालय महाल नागपूर येथे ग्रंथालय विभाग आणि मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाअंतर्गत वाचन-लेखन कौशल्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

कार्यशाळेचे उद्घाटक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उज्वल लांजेवार यांनी आपल्या संबोधनातून प्रत्येकाच्या आयुष्यात वाचनसंस्कृतीचे असलेले महत्त्व अधोरेखित केले. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात सुप्रसिद्ध कवयित्री श्रध्दा शौर्य यांनी लेखन हे विचार अभिव्यक्त करण्याचे माध्यम आहे तर वाचन हे लेखन प्रगल्भ करण्याचे प्रभावी साधन आहे, असे विचार व्यक्त केले.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

Super scribed and sealed offers in Two Bid system are invited from reputed Firms/Contractors/ Agencies for tender for **Empanelment of Agencies for Breakdown Maintenance of Substation in Nagpur Urban Circle, Nagpur Zone having tender no. SE/NUC/T/BMSS/2025-26/T-05.** The Tender details/ documents for above Tenders are available on website etender.mahadiscom.in/eat App/ Tender fees is Rs.1180.00 including GST. The Tender documents can be downloaded from aforesaid website from Dt.20.01.2025. Submit the tender duly filled in on or before Dt. 10.02.2025 before 11.00 Hrs.

NZ/PR No.07/25 Dt.19.01.2025. **Superintending Engineer (NUC)**

महानिर्मिती

इ-निविदा सूचना
क्र.ना.औ.वि.कें/२०२४-२५/४७

| अ. क्र. | निविदा क्र./ विभाग | निविदा तपशील | अंदाजे रक्कम (रु.) इसारा रक्कम (रु) |
|---|---|---|---|
| १. | ३०००० ५३४११ / ओडीपी | डब्ल्यूटीपी २ च्या क्लॅरिफायर्ससाठी सुट्टया स्पेयर्सची खरेदी. | ३४,४१,२२०/- / ३७,९२०/- |
| २. | ३००००५४१६२ / ए.यु.सी. | ना.औ.वि.केंद्र येथे राख वापराच्या कामात दैनंदिन सहाय्य प्रदान करण्यासाठी द्विवार्षिक कामाचा करार. | ४०,६१,११९/- / ४४,११५/- |
| ३. | ३००००५३८७१ / आयटी | ओ.टी.डी. मीटरसह ओएफसी केबल टाकणे, चाचणी करणे आणि स्प्लिसिंग करणे आणि आवश्यकतेनुसार युटीपी केबल टाकणे. | ४,७५,०७५/- / ८,२५५/- |
| ३. | ३००००५४२८९ / सीएचपी | कन्व्हेयर १३ अ/ब च्या बोगदयाच्या क्षेत्रामध्ये एअर वेंटीलेशन सीस्टीमची दुरुस्ती सुधारणा आणि पुनर्सयचित करण्याचे काम. | २१८,८५,१००/- / २,२२,४००/- |

नविन विक्रेते / नोंदणी नसलेल्या विक्रेत्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या कंपनीची ई-टेंडरिंगसाठी नोंदणी करावी.
अधिक तपशीलांसाठी वेबसाइटवर लॉग इन करा.
प्रत्येक निविदा किंमत रू. ११८०/- , अधिक माहिती व अद्यतनांसाठी कृपया https://eprocurement.mahagenco.in येथे भेट द्यावी.

मुख्य अभियंता, नाशिक औ.वि.केंद्र, एकलहरे

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **TUSHARKUMAR DNYANESHWAR MOUNDEKAR.** NOW MY NEW NAME IS **TUSHAR DNYANESHWAR MOUNDEKAR.** **ADD :** 38, SHIVAJI COLONY HUDKESHWAR ROAD NAGPUR 440034.

MY OLD NAME WAS **SURESH CHUGWANI.** NOW MY NEW NAME IS **SURESHKUMAR CHUGWANI.** **ADD :** SINDHI COLONY ZULELAL WARD GONDIA 441601.

MY OLD NAME WAS **SREENIVASA RAO PINNAKA.** NOW MY NEW NAME IS **SREENIVASARAO PINNAKA.** **ADD :** FLAT NO-803, WING-C, MORAJ WATERFALL GATEWAY, OPP IIM, MIHAN, KHAPRI, NAGPUR 441108.

MY OLD NAME WAS **SUSHANT SIDDHAMSHETTIWAR.** NOW MY NEW NAME IS **SUSHANT SANJAY SIDDAMSETTIWAR.** **ADD :** FLAT NO 401 HIMALAYA GALAXY 1 AMRAVATI ROAD NEAR, UNIVERSITY CAMPUS KACHIMET NAGPUR MAHARASHTRA 440023.

MY OLD NAME WAS **AFSHEEN BANO POTHIYAWALA.** NOW MY NEW NAME IS **AFSHIN BANOO MOHAMMAD FARUK POTHIYAWALA.** **ADD :** JUBEDA MANJIL, BEHIND DOCTOR SOMANI NURSING HOME, RAVISHANKAR WARD CIVIL LINE GONDIA 441601 MS.

MY OLD NAME WAS **MD FARUK POTHIYAWALA.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD FARUK ABDUL LATIF POTHIYAWALA.** **ADD :** JUBEDA MANJIL, BEHIND DOCTOR SOMANI NURSING HOME, RAVISHANKAR WARD CIVIL LINE GONDIA 441601 MS.

# नेम मशाल आणि तुतारीवर...



प्रदेश भाजपाचे अधिवेशन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत शिर्डी येथे नुकतेच पार पडले. विधानसभेच्या निवडणुकीत भाजपाला धुवांधार यश मिळाले. राज्यात भाजपाने १४९ मतदारसंघात निवडणूक लढवली आणि मतदारांनी १३२ उमेदवार विजयी करून विधानसभेत पाठवले. महायुतीचे २८८ पैकी २३५ जागांवर आमदार विजयी झाले. काँग्रेस, उबाठा सेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या महाआघाडीला पन्नास जागाही मिळाल्या नाहीत. आमदारांची किमान संख्या नसल्याने विधानसभेत विरोधी पक्ष नेताही महाआघाडीला मिळू शकत नाही.

विधानसभेत मिळालेल्या अभूतपूर्व जनादेशानंतर प्रदेश भाजपाचे साईनगरीत वाजत-गाजत अधिवेशन संपन्न झाले. अधिवेशनाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेशचे कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, पक्षाचे राज्यातील मंत्रीगण, माजी केंद्रीयमंत्री खासदार नारायण राणे, तसेच पीयूष गोयल, मुरलीधर मोहळ, राहुल नार्वेकर, प्रा. राम शिंदे, रावसाहेब दानवे, नितेश राणे आदी दिग्गजांसह वीस हजार सक्रिय कार्यकर्ते उपस्थित होते. भाजपाचे शिर्डीचे अधिवेशन म्हणजे प्रत्येक कार्यकर्त्यांच्या रोमारोमात उत्साह व जोश होता. भाजपाचे स्फूर्तिस्थान आणि देशाचे सर्वोच्च नेते नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाची हॅटट्रीक केली. महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत भाजपाने अभूतपूर्व विजय संपादन करून पुन्हा सत्ता काबीज केली आणि आता एकच लक्ष्य म्हणजे राज्यातील महापालिका, नगर परिषदा, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांवर भाजपाचे कमळ फुलवायचे आहे. मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई, पिंपरी-चिंचवड, नागपूरसह सर्व २९ महापालिकांवर शतप्रतिशत विजय संपादन करण्याचा संकल्प शिर्डी अधिवेशनात करण्यात आला. राज्यभर सर्वत्र भगवा फडकविण्याचा अजेंडा घेऊनच भाजपाचे कार्यकर्ते आपल्या मुक्कामी रवाना झाले.

साईनगरीतील भाजपाच्या अधिवेशनात स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीसाठी पक्षाच्या केडरला ऊर्जा देण्यात आली तसे राज्यातील प्रमुख राजकीय शत्रू असलेल्या शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यावर तेवढ्याच ताकदीने हल्ला चढविण्यात आला. अमित शहा आणि देवेंद्र फडणवीस यांनी तर तुतारी व मशाल चिन्ह असलेल्या दोन्ही पक्षांच्या नेतृत्वाचे अक्षरशः वस्त्रहरण केले. त्यांच्या कावेबाज राजकारणाची चिरफाड केली. एकाला दगाबाज तर दुसऱ्याला गद्दार ठरवले. विधानसभा निवडणुकीत जसे त्यांचे राजकारण गाडले तसे आता महापालिका-जिल्हा परिषद निवडणुकीत त्यांना धडा शिकविण्यासाठी सज्ज व्हा, असे आवाहन शहा-फडणवीसांनी केले. अमित शहा यांनी शरद पवार व उद्धव ठाकरे यांच्या राजकारणाला दगाबाज व विश्वासघातकी संबोधल्यामुळेच अधिवेशन तापले आणि गाजले असे म्हणावे लागेल.

पंचायत ते पार्लमेंट आणि शतप्रतिशत हे भाजपाच्या विस्ताराचे परवलीचे शब्द आहेत. कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य निर्माण करण्यासाठी हे दोन्ही शब्द यापूर्वी अनेकदा उच्चारले गेले आहेत. राज्य विधानसभा निवडणुकीच्या देदीप्यमान विजयानंतर आता स्थानिक स्वराज संस्थांवर शंभर टक्के कमळ फुलविण्यासाठी शतप्रतिशतचा नारा देण्यात आला आहे. (१) २३ नोव्हेंबर २०२४ महाराष्ट्र भाजपाच्या इतिहासातील ऐतिहासिक दिवस म्हणून नोंद राहील. भाजपाने १४९ जागा लढवल्या व जनतेने १३२ आमदार जिंकून दिले. (२) १९७८ पासून शरद पवारांनी चालवलेले दगाबाजीचे राजकारण या निवडणुकीत जनतेने वीस फूट जमिनीत गाडले. (३) २०१९ मध्ये उद्धव ठाकरे यांनी बाळासाहेब ठाकरेंच्या विचारांशी द्रोह केला, बाळासाहेबांच्या सिद्धांताशी तडजोड केली, फसवणूक व लबाडी करून मुख्यमंत्री झाले म्हणून जनतेनेच त्यांना त्यांची जागा दाखवून दिली. (४) भाजपाला राज्यात जनतेने प्रचंड बहुमताने सत्ता दिली व फडणवीस हे स्थिर सरकार देतील. (५) स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीत विरोधकांना एकही जागा मिळवून देऊ नका. (६) इतके समर्थ ताकदवान व्हा की दगाबाजी करण्याची कोणाची हिम्मत होणार नाही. - इति अमित शहा...

अमित शहा बोलल्यावर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) आणि उबाठा सेनेच्या नेतृत्वाला मिरच्या झोंबणे स्वाभाविक होते. शरद पवार हे स्वतः कधी वैयक्तिक टीका टिप्पणी करीत नाहीत पण त्यांना दगलबाज म्हटल्याने त्यांनी तेवढ्याच वेगाने पलटवार केला. १९७८ मध्ये शरद पवारांनी वसंतदादा पाटील यांचे सरकार पाडून पुलोद सरकार महाराष्ट्रात स्थापन केले होते. तेव्हा वसंतदादांच्या पाठीत पवारांनी खंजीर खुपसला अशी टीका झाली होती. पण वसंतदादा पाटील-नाशिकराव तिरपुडे वादात अस्थिर सरकार पाडणे गरजेचे होते असे अनेकांचे मत होते. मुंबईतील एका मोठ्या वृत्तपत्राने तर वसंतदादांचे सरकार पडल्यावर ही तर श्रींची इच्छा, असा अग्रलेखाचा मथळा दिला होता. पुलोद सरकारमध्ये समाजवादी, शेकाप पक्ष, जनसंघाचेही मंत्री होते. जनसंघाचे उत्तमराव पाटील, हशू अडवाणी, प्रमिला टोपले यांच्याकडे महत्त्वाची खाती शरद पवारांनी सोपवली होती. हे सरकार पडले नाही, तर तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी ते बरखास्त केले.

शरद पवार हे चार वेळा मुख्यमंत्री झाले. लातूरमधील किल्लारी येथे पहाटे ३ वाजता मोठा भूकंप झाल्यावर मुंबईत असणारे पवार सकाळी ७ वाजता स्वतः तिथे जातीने हजर झाले व सर्व शासकीय यंत्रणा कार्यरत करून मदत कार्याला चालना दिली. गुजरातला कच्छला भूकंप झाला तेव्हा सत्तेवर असलेल्या पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी पवार हे विरोधी पक्षात असतानाही आपत्कालीन व्यवस्थापन समितीचे अध्यक्षपद दिले व त्यांना कॅबिनेट मंत्रीपदाचा दर्जा दिला होता. केंद्रातील मोदी सरकारनेच पवार यांना पद्मविभूषण हा पुरस्कार देऊन सन्मानित केले होते. असे असताना शहा व फडणवीस शिर्डीच्या अधिवेशनात पवारांवर का तुटून पडले?

गेल्या दोन-अडीच वर्षांत ठाकरेंची शिवसेना फुटली आणि पवारांची राष्ट्रवादी काँग्रेसही फुटली. दोन्ही पक्षांतून बाहेर पडलेले ८० हून जास्त आमदार भाजपाचे समर्थन करीत महायुतीत दाखल झाले. दोन पक्षांत झालेली ही मोठी तोडफोड होती. त्याचे श्रेयही भाजपाच्या नेत्यांनी जाहीरपणे घेतले. लोकसभा निवडणुकीत पवार-ठाकरे यांच्या पक्षांनी भाजपाला धक्का जरूर दिला पण विधानसभा निवडणुकीत दोन्ही पक्षांची स्थिती दयनीय झाली. तरीही महापालिका व जिल्हा परिषद निवडणुकीसाठी या दोन पक्षांचे व त्यांच्या नेतृत्वाचे भाजपाला आव्हान का वाटावे? याचे एक प्रमुख कारण म्हणजे भाजपाला नुसता विजय किंवा नुसते बहुमत मिळवायचे नाही, तर शतप्रतिशत विजय साध्य करायचा आहे.

मोदी-शहा महाराष्ट्राला गुलामीत टाकू पाहत आहे, अफजल खानाच्या फौजा दिल्लीहून महाराष्ट्रावर चाल करून येत आहेत, अब की बार भाजपा तडीपार, महाराष्ट्र द्रोही रावणाचे दहन करा, अशा वल्गना कोण करीत होते? त्यांना जनतेने त्यांची जागा दाखवली म्हटले तर संतापायचे कशासाठी?

उबाठा सेनेच्या प्रमुखांच्या पुत्राने गेल्या काही दिवसांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची तीन वेळा भेट घेतली, स्वतः पक्षप्रमुखांनी मुख्यमंत्र्यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या, गडचिरोलीला नक्षलवादी शरण आले व त्या भागात बस सुरू झाली म्हणून मुखपत्राने मुख्यमंत्री फडणवीस यांचे अभिनंदन केले. रोज भाजपा आणि मोदी-शहांच्या विरोधात लेखणी आणि वाणी झिजवत असताना हा बदल कशासाठी हे गूढ आहे. पुन्हा भाजपाशी जमवून घेण्याचे तर प्रयत्न नाहीत नाही? अशी चर्चाही सुरू झाली. पण शिर्डीच्या अधिवेशनात शहा, फडणवीस व बावनकुळे यांनी विश्वासघातकी राजकारणावर जी झोड उठवली त्यातून उबाठा सेनेला भाजपाने महायुतीचे दरवाजे बंद केले आहेत, हा स्पष्ट संदेश दिला आहे.

गुजरातने देशाला व त्या राज्याला अनेक चांगले नेते व प्रशासक दिले. केंद्रातही सरदार वल्लभभाई पटेल, गोविंद वल्लभ पंत, यशवंतराव चव्हाण, शंकरराव चव्हाण, असे अनेक दिग्गज नेते गृहमंत्री झाले पण त्यात कोणालाही राज्यात तडीपार केलेले नव्हते, असे उपहासात्मक भाष्य शरद पवारांनी करून शहांवर पलटवार करण्याचा प्रयत्न केला. केंद्रातील अन्य मोठ्या नेत्यांशी तुलना करताना कुठे इंद्राचा ऐरावत व कुठे श्याम भट्टाची तट्टाणी अशीही पवारांनी मराठी म्हण ऐकवली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहांची प्रतिमा म्हणजे देशपातळीवर गृहमंत्री म्हणून तडफदार व धडाकेबाज अशी आहे. सर्वच राजकीय पक्षांना त्यांचा धाक वाटतो. भाजपाला सर्वत्र सत्ता हवी आहे, हे खरे आहे. पण पराभव झाला म्हणून भाजपा कधी रडत बसत नाही आणि विजय मिळाल्यावर कधी गाफील राहत नाही. शहा व पवार यांच्यातील वार-पलटवाराला माध्यमांनी मोठी प्रसिद्धी दिली. तडीपार की निवासित अशीही चर्चा झाली. अरे ला कारे झाल्याने देशही हादरला. पण तिसऱ्याच दिवशी पवारांनी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन फेब्रुवारी महिन्यात दिल्लीत होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे निमंत्रण दिले... भाजपाच्या शतप्रतिशत घोषणेमुळे आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, महाराष्ट्राचे दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांनाही मोदी-शहांच्या सुरात सूर मिसळूनच राजकारण करावे लागणार आहे, हा शिर्डी अधिवेशनाने संदेश दिला आहे.

**महाराष्ट्रनामा**



सुकृत खांडेकर
०९५९४२२४०००
sukritforyou@gmail.com

# मुलांच्या स्मार्ट फोन वापरावर बंधने हवीच !

१६ वर्षांखालील मुलांना इंटरनेट वापरापासून दूर ठेवणारे विधेयक गेल्यावर्षी ऑस्ट्रेलियाच्या सभागृहात मांडण्यात आले. संसदेतील ११५ सदस्यांपैकी १०२ सदस्यांनी या विधेयकाला पाठिंबा दर्शवला त्यामुळे लवकरच कायदा स्वरूपात ते जनतेसमोर येईल. कायदा करताना त्यामध्ये सामाजिक माध्यमांवरही मर्यादा घालण्यात येणार आहेत. टिकटॉक, फेसबुक, स्नॅपचॅट, रेडिट, एक्स, इंस्टाग्राम या आणि अशा स्वरूपाच्या कोणत्याही सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर १६ वर्षाखालील मुलांना खाते बनवता येणार नाही. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मकडून सुमारे अडीच अब्ज रुपयांचा दंड आकारला जाणार आहे. काही मोजकी मंडळी सडली तर देशभरातून या विधेयकाचे स्वागत करण्यात येत आहे. लहान मुलांकडून इंटरनेटचा तसेच सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सचा केला जाणारा अतिवापर ही देशासमोर एक मोठी समस्या बनली होती. त्यादृष्टीकोनातून हा निर्णय घेतला गेला आहे.

भारताची परिस्थिती पाहता भारतातील लहान मुलांकडून आज सोशल मीडियाचा आणि इंटरनेटचा बेसुमार वापर केला जात आहे ज्याचा परिणाम मुलांच्या आरोग्यावर होत आहे. हट्ट करणाऱ्या मुलाला शांत ठेवण्यासाठी किंवा त्याला वेळ घालवण्यासाठी पालक मंडळी आपले स्मार्ट फोन सर्रासपणे पाल्याच्या हाती देतात. काही महाभाग तर आपल्या मुलांना स्वतंत्र स्मार्टफोन्स उपलब्ध करून देतात. आज घरोघरी वायफाय आल्याने आणि इंटरनेट डाटाही स्वस्त झाल्याने या स्मार्टफोन्सवरील इंटरनेटचा मुले मुक्तपणे वापर करताना दिसतात. ऑनलाईन व्हिडीओ गेम्स खेळण्यात आणि रिल्स पाहण्यात ती तासनतास रमतात. रिल्सना वयाचे बंधन नसल्याने हिंस्त्र स्वरूपाचे, अश्लील कंटेंट आणि संवाद असलेले, शिव्यांचा मुक्त वापर केलेले रिल्स मुलांच्या पाहण्यात येतात. सातत्याने असे



रिल्स पाहिल्याने त्याचे मुलांच्या कोवळ्या मनावर विपरीत परिणाम होतात. रिल्समध्ये ऐकलेल्या शिव्या मुलेही एकमेकांना देऊ लागतात. ज्यामुळे मुलांमध्ये भांडणे होऊन त्याचा पालकांच्या डोक्याला ताप होतो. लॉकडाऊनच्या काळात मुलांचे शिक्षण थांबायला नको म्हणून ऑनलाईन शिक्षणाचा पर्याय निवडण्यात आला होता ज्यामुळे प्रत्येक मुलाच्या हातात स्मार्टफोन आला. या प्रदीर्घ कालावधीत स्मार्टफोन वापरण्यात मुले पारंगत झाली; मात्र शिक्षणाव्यतिरिक्त मनोरंजनाचे प्रचंड मोठे दालन या हातात मावणाऱ्या स्मार्टफोनमध्ये सामावले असल्याचे मुलांना लहान वयातच ज्ञात झाल्याने मुले मनोरंजनाच्या आणि खेळाच्या अन्य साधनांपेक्षा स्मार्ट फोन्समध्ये अधिक रमु लागली आहेत. स्मार्ट फोन्सच्या अतिवापरामुळे मुलांमध्ये चिडचिड करणे, राग येणे, सूड भावनेने वागणे, तुलना करणे. मनोराज्यात रमणे यांसारखे दोष वाढले आहेत. इतरांच्या तुलनेत स्मार्ट फोन्स वापरणाऱ्या मुलांमध्ये अपमानाचे आणि आत्महत्येचे विचार अधिक प्रमाणात येत असल्याचेही एका सर्वेक्षणातून सिद्ध झाले, त्यामुळेच गेल्या काही वर्षांत लहान मुलांच्या आत्महत्येचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. अधिक प्रमाणात कार्टून्स बघून मुले त्यातील पात्रांप्रमाणेच वागू लागतात. मुलांच्या मानसिक आरोग्यावर स्मार्ट फोन्सचा विपरीत परिणाम होतो, त्यांची शारिरिक आणि बौद्धिक वाढही खुंटते. पौगंडावस्थेतील मुले स्मार्ट फोन्सवरील रिल्स आणि हिंसक दृश्ये पाहून व्यसनाच्या आहारी जाऊ लागल्याचेही निरीक्षणातून सिद्ध झाले आहे. गेल्या काही काळात सायबर गुन्हेगारीचे प्रमाण वाढले असून या सायबर गुन्हेगारीलाही मुले बळी पडू लागली आहेत. स्मार्ट फोन्सचा अति वापर मुलांमध्ये शिक्षणाविषयी, मैदानी खेळाविषयी रुची कमी करतो. मुलांच्या मेंदूचा विकासही स्मार्ट फोनच्या अतिवापरामुळे खुंटतो. मुली भावनाशील असल्याने स्मार्ट फोनचा अधिक वापर करणाऱ्या लहान मुलींच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर लवकर परिणाम होतो. जगभरातील हवी ती माहिती चुटकीसारखी उपलब्ध करून देणारा स्मार्ट फोन स्वतः स्मार्ट असला तरी त्याच्या अतिवापरामुळे लहान मुलांचे आरोग्य आणि भवितव्य धोक्यात आले आहे हे निश्चित. आधुनिक जीवनाचा अविभाज्य भाग असणाऱ्या स्मार्ट फोनपासून मुलांना पूर्णपणे दूर करूनही चालणार नाही; मात्र आजमितीला प्रत्येक पालकांनी आपल्या मुलांचा स्क्रीन टाइम निश्चित करणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे ऑस्ट्रेलियाने आपल्या देशात मुलांच्या स्मार्ट फोन वापरावर बंधने आणली, तशा प्रकारची बंधने भारतातही आणण्याची आज नितांत गरज आहे.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई
मो.क्र. ९६६४५५९७८०

# चॅम्पियन ट्रॉफी साठी संतुलित संघ निवड

पुढील महिन्यात १९ फेब्रुवारी ते ९ मार्च या कालावधीत पाकिस्तान आणि दुबई येथे एकदिवसीय सामन्यांची चॅम्पियन ट्रॉफी स्पर्धा होणार असून या स्पर्धेसाठी निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर व कर्णधार रोहित शर्मा यांनी यांनी १८ तारखेला १५ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली. या संघात रोहित शर्मा व युवा शुभमन गिल हे भारताचे अनुभवी आणि युवा खेळाडू भारताच्या डावाची सुरवात करतील. विशेष म्हणजे हे दोघे या संघाचे कर्णधार आणि उपकर्णधार आहेत यांच्यासोबत तिसरा सलामीवीर म्हणून यशस्वी जयस्वाल ची निवड करण्यात आलेली आहे. मधल्या फळीची जबाबदारी अनुभवी विराट कोहली, , श्रेयस अय्यर, के एल राहुल तसेच यष्टीरक्षक ऋषभ पंत यांच्यावर टाकण्यात आली आहे अनुभवी के एल राहुल हा अतिरिक्त यष्टीरक्षक म्हणूनही जबाबदारी पार पाडेल. विशेष म्हणजे दोघेही उत्तम फिनिशर म्हणून आपली जबाबदारी पार पाडतात. भारताची फलंदाजी अतिशय बलवान असून रोहित, शुभमन व विराट हे पहिल्या तीन क्रमांकाचे फलंदाज जगातील सर्वोत्तम फलंदाज मानले जातात. एकदिवसीय सामन्यात या तिघांची कामगिरी उत्तम असून तिघेही एकदिवसीय सामन्यातील श्रेष्ठ फलंदाज समजले जातात. भारतात झालेल्या एकदिवसीय विश्वचषकात तसेच मागील वर्षी वेस्ट इंडिज मध्ये झालेल्या टी २० विश्वचषकात तिघांनीही चांगली कामगिरी केली आहे. या तिघांची कसोटीतील कामगिरी त्यांच्या लैकिकास साजेशी झालेली नाही त्यामुळे त्यांच्यावर टीकेची झोड उठली असली तरी मर्यादित षटकांच्या सामन्यात त्यांची कामगिरी नजरेत भरणारी आहे. सध्या जरी ते त्यांच्या सर्वोत्तम फॉर्ममध्ये नसतील तरी ते या स्पर्धेत पुन्हा आपल्या पूर्वीच्या फॉर्ममध्ये येऊ शकतात ते जर पुन्हा फॉर्मात आले तर चॅम्पियन ट्रॉफी जिंकण्याच्या भारताच्या आशा पल्लवित होतील. चौथ्या क्रमांकावर युवा श्रेयस अय्यर येईल. भारताचा तो भरवशाचा फलंदाज असून एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत त्याने पाचशे पेक्षा अधिक धावा काढल्या आहेत. तो फ्लॉप गेला तर त्याची जागा के एल राहुल घेईल. तो मैदानात सर्वत्र फटकेबाजी करू शकतो. तोही भारताचा भरवशाचा फलंदाज मानला जातो. त्यानंतर ऋषभ पंत हा धडाकेबाज यष्टीरक्षक फलंदाज मैदानात येईल. तो स्फोटक फलंदाज असून मॅच फिनिशर आहेत. कमी चेंडूत जास्त धावा काढून संघाला विजय मिळवून देण्यात त्याचा हातखंडा आहे. त्यानंतर हार्दिक पांड्या हा जगातील सध्याचा सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडू येईल. तो गोलंदाजी, तडाखेबंद फलंदाजी आणि प्रभावी क्षेत्ररक्षण करून संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावतो. त्याने आपल्या अष्टपैलू खेळीने भारताला अनेक विजय मिळवून दिले आहेत. वॉशिंग्टन सुंदर हा आणखी एक अष्टपैलू खेळाडू भारतीय संघात आहे. ऑफस्पिन गोलंदाजी आणि तडाखेबंद फलंदाजी हे त्याचे वैशिष्ट्ये आहे. गोलंदाजीमध्ये निवड समितीने तीन फिरकी गोलंदाजांना संधी दिली असून अनुभवी रवींद्र जडेजा सोबत फॉर्मात असलेला चायनामन गोलंदाज कुलदीप यादव आणि लेफ्ट आर्म स्पिनर अक्षर पटेल यांना संधी मिळाली आहे. तिघेही डावखुरे मंदगती गोलंदाज आहेत त्यामुळे मंदगती गोलंदाजीत विविधता नसल्याची टीका टीकाकार करीत असले तरी तिघेही फॉर्ममध्ये आहे. जडेजा हा भारताचा सर्वोत्तम मंदगती गोलंदाज आहे शिवाय तो फलंदाजीही करतो आणि चांगला क्षेत्ररक्षक आहे म्हणजे तो एक उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू आहे. कुलदीप यादव जरी डावखुरा असला तरी तो चायनामन गोलंदाज आहे आणि विशेष म्हणजे तो फॉर्ममध्ये आहे. फॉर्ममध्ये असलेल्या खेळाडूला संधी देणे केंव्हाही चांगले. अक्षर पटेल गोलंदाजीसोबत फलंदाजीही करू शकतो त्याची फलंदाजी भारतासाठी बोनस ठरेल. जसप्रीत बुमराह व मोहम्मद शमी या अनुभवी वेगवान गोलंदाजांसोबत अर्शदिप सिंग या युवा गोलंदाजाला देखील निवड समितीने संधी दिली आहे. निवड समितीने या डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाला संधी देऊन वेगवान गोलंदाजीत विविधता आणण्याचा प्रयत्न केला आहे. मर्यादित षटकांच्या सामन्यात डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाचे महत्व अनन्यसाधारण आहे. २०११ साली झहीर खान या डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाने अप्रतिम कामगिरी करून भारताला विश्वचषक मिळवून दिला होता इतकेच नाही तर मागील वर्षी भारताने जिंकलेल्या टी २० विश्वचषक स्पर्धेत अर्शदीप सिंगनेच सर्वाधिक बळी मिळवले होते. डावाच्या शेवटी म्हणजे डेथ ओव्हरमध्ये अर्शदिप सिंगची गोलंदाजी प्रभावी ठरते. निवड समितीने निवडलेला हा संघ चांगला आहे. जुन्या आणि नव्या खेळाडूंना संधी देत जोश आणि होश यांचे संतुलन साधण्याचा प्रयत्न निवड समितीने केला आहे त्यात ते बऱ्यापैकी यशस्वीही ठरले आहेत. चॅम्पियन ट्रॉफिसाठी निवडण्यात आलेला हा संघ संतुलित आहे हे मान्य करून नीवड समितीचे याबाबत अभिनंदन करावे लागेल. आता जबाबदारी आहे ती निवडण्यात आलेल्या या १५ खेळाडूंची. २०१३ नंतर भारताला चॅम्पियन ट्रॉफीवर नाव कोरण्यात अपयश आले आहे. हे अपयश झटकून नव्याने सुरवात करण्याची संधी या निमित्ताने या संघाला मिळणार आहे. १९९८ साली सुरू झालेली ही स्पर्धा भारताने २००२ आणि २०१३ साली जिंकली होती तर २०१७ साली भारत या स्पर्धेचा उपविजेता होता. या स्पर्धेसाठी निवड झालेले सर्व खेळाडू अनुभवी आहेत. एकदिवसीय सामने खेळण्याचा सर्वांना मोठा अनुभव आहे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे ही स्पर्धा पाकिस्तानात होणार असली तरी भारताचे सर्व सामने दुबईत होणार आहे. संघात निवड झालेल्या सर्व खेळाडूंना दुबईत खेळण्याचा चांगला अनुभव आहे त्यामुळे देशासाठी सर्वोत्तम कामगिरी करून भारताला १२ वर्षांनंतर चॅम्पियन ट्रॉफी जिंकून देण्याची जबाबदारी ते यशस्वीपणे पार पाडतील अशी आशा करूया. भारतीय संघाला एकदिवसीय चॅम्पियन ट्रॉफी स्पर्धेसाठी मनापासून शुभेच्छा!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५



# प्रभू प्रेमाचा अद्भुत खेळ

**संत राजिन्दर सिंह जी महाराज**

परमेश्वराच्या खऱ्या खेळाशी व परमेश्वराचा खऱ्या लिलेशी या जगाचा कोणत्याही खेळाच्या तुलनेने संबंध नाही. परमेश्वराचा जगाशी वेगळाच खेळ चालू आहे, जो प्रेमाच्या नियमावर आधारित आहे. परमेश्वराने प्रेमाने या सृष्टीची रचना केली. त्यांनी मोठ्या प्रेमाने सर्व प्राण्यांना बनविले आहे. हा एक असा खेळ आहे ज्यामध्ये परमेश्वर आपल्यावर प्रेम करतो, आपण सुद्धा त्यांच्यावर प्रेम करावे असे ते इच्छित असतात. आपण प्रेम हे केवळ परमेश्वर आणि प्रत्येक प्राणी मात्रावर करायचे नसून तर आपण परमेश्वराच्या परिवारातील सर्व सदस्यांवर देखील प्रेम केले पाहिजे. याचा अर्थ हा आहे की, आपल्याला परमेश्वराच्या सृष्टीच्या सर्व प्राण्यांवर जसे आपले सहकारी आणि मित्र यांच्या व्यतिरिक्त या जगातील निंम्न स्तरावरील प्राण्यांवर सुद्धा प्रेम असावे.

माणसास त्याच्याजवळ असलेल्या धन संपत्तीच्या आधारावर पारखले जात नाही. परंतु त्याने इतरांना दिलेल्या प्रेमाच्या आधारावरच पारखले जातं. काय आपण कधी परमेश्वरावर प्रेम केलं आहे का? काय आपण कधी आपल्या नातेवाईकांवर, मित्रमंडळी वर प्रेम केले आहे का? काय आपण कधी या सर्व सृष्टीवर प्रेम केले आहे का? अशा प्रकारचे प्रेम आपल्या विचारातून, बोलण्यातून आणि कृतीतून व्यक्त होते. ते इतरांसाठी दाखवलेल्या दयाळूपणाने दिसून येते. परमेश्वराच्या प्रति प्रेमाचा हा भाव दुसऱ्यांची काळजी करणे आणि निष्काम भावनेने त्यांची सेवा करणे यातून व्यक्त होतो.

प्रभू प्रेमाचा हा कोणता खेळ आहे? परमपिता परमेश्वर प्रेम आणि आनंदाचा महासागर आहे. जेव्हा आपण त्याच्याशी जोडले जातो तेव्हा सुद्धा आपण परमानंदाच्या महासागरात डुबकी मारतो. हा संसाराचा खेळ इतर कोणत्याही खेळाच्या तुलनेने अधिक आनंददायक आहे. लहान मुलांच्या व्यापार खेळण्यासारखा, भरपूर अधिक संपत्ती जमवताना, खेळाचे सामने पाहतांना, हे सांसारिक सुखापेक्षा चांगले आहे तो हा आनंद आहे, ज्याच्या तुलनेने या सृष्टीत मिळणारे सारे आनंद फिके पडतील.

जेव्हा आपण या संसार सोडून जातो तेव्हा आपल्याला या गोष्टीवरुन पारखले जाते की, आपण या जीवनात दुसऱ्यावर किती प्रेम केले. अशा प्रकारे आपल्या जीवनाचा पडताळा या तथ्यांवर आधारित आहे की, आपण इतरांना किती प्रेम दिले व त्यांना किती आनंदित केले. जेव्हा आपण जीवनाच्या अंतिम क्षणी स्वतःवर सर्वसाधारण नजर टाकली असता तेव्हा ते सर्व प्रेम जे आपण इतरांना दिले आणि जो आनंद आपल्याकडून इतरांना मिळाला तो आपण स्वतः आपल्या अंतरी अनुभवतो.

आपण जो वेळ परमेश्वरावर प्रेम करण्यात घालवतो तो आपल्यात अध्यात्मिक चैतन्य वृद्धिंगत करतो आणि आपल्याला जड देहाच्या वर म्हणजे देह भावनेवर येण्याच्या कलेमध्ये सक्षम बनवत असतो जेणेकरून आपला आत्मा अंतरीय अध्यात्मिक मंडळांमध्ये भरारी घेऊ शकेल आणि पिता-परमेश्वर मध्ये कायमचे एकरूप होईल.

चला तर! आपण बघू की जीवनाच्या अंत समयी आपण आपली सर्व धनसंपत्ती, जमीनजुमला इथे सोडून जातो. तेव्हा आपल्या बरोबर केवळ तीच वेळ येईल जी आपण परमेश्वराच्या नामस्मरणासाठी दिली. आपण आपल्याबरोबर अशा हिशोबाचे खाते घेऊन जाऊ ज्यामध्ये चांगली अथवा वाईट कर्म नसतील. परंतु शुद्ध पवित्र अशी नोंद असेल, त्यामध्ये ध्यान-अभ्यासाकरिता दिलेला वेळ आणि संत महापुरुषांच्या स्मरणात व्यक्तीत केलेल्या वेळेचा हिशोबाचा लेखा-जोखा असेल. प्रभू परमेश्वराच्या प्रेमात लावलेला वेळच खऱ्या अर्थाने परमेश्वरा बरोबर प्रेमाचा खेळ खेळल्या सारखे असेल.

# विविध भागातील बांधकामादरम्यान सुरक्षेच्या उपाययोजनांचे तीनतेरा!

**वाचक लिहितात**

शहरात अनेक भागात ठीक ठिकाणी मोठे बांधकाम सुरू आहे. परंतु बांधकामाच्या ठिकाणी सुरक्षिततेचे नियम न पाळल्यामुळे आजूबाजूच्या नागरिकांना तसेच त्या भागातून ये-जा करणाऱ्या प्रवाशांना मोठा धोका निर्माण झाला आहे. बांधकामाच्या ठिकाणी येणाऱ्या साहित्य, वाळू, सिमेंट इत्यादी रस्त्यावर पडून सार्वजनिक मार्गात अडथळा निर्माण होत आहे. बांधकामाचे वेळी मोठे खिळे, सळाखी रस्त्यावर तसेच आजूबाजूच्या प्लॉट मधे पडतात. यामुळे अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. शिवाय, बांधकाम अगदी रस्त्याच्या कडेला सुरू असल्यामुळे त्या भागात चालणाऱ्या पादचारी आणि वाहनचालकांसाठी मोठा धोका निर्माण झाला आहे.

भारतीय बांधकाम कायदा तसेच स्थानिक महापालिका कायद्यानुसार सार्वजनिक ठिकाणी अशा प्रकारच्या बांधकामांदरम्यान सुरक्षिततेच्या दृष्टीने काळजी घेतली जाणे गरजेचे आहे. त्यात बांधकामाचे साहित्य रस्त्यावर पडू नये यासाठी योग्य उंचीचे, योग्य अंतरावर कुंपण (बॅरिकेडिंग) लावणे. धूळ आणि प्रदूषण टाळण्यासाठी पाणी फवारणी करणे. सार्वजनिक सुरक्षेसाठी ठळक इशारे आणि सूचनाफलक लावणे. बांधकामाच्या ठिकाणी योग्य तोडगा काढून वाहनतळ व पादचाऱ्यांसाठी मार्ग उघडा ठेवणे. बांधकाम ठिकाणी ये-जा करणाऱ्या मोठ्या वाहनांचा त्रास परिसरातील वाहतुकीला होणार नाही, तसेच त्यामुळे परिसरातील इलेक्ट्रिक तारा किंवा पाण्याची पाइपलाइन खंडित होणार नाही याची काळजी घ्यायला हवी. पण असे कुठेच दिसत नाही. शंकर नगर, शिवाजी नगर, धरमपेठ, बजाज नगर इत्यादी ठिकाणी मोठाल्या इमारतींची कामे सुरू आहेत. एखादा अपघात झाल्यावर उपाय करण्यात काय अर्थ? कृपया महानगर पालिकेने लक्ष घालावे, काही अघटीत घडण्यापूर्वीच सर्वेक्षण करून उपाय योजना कराव्या ही विनंती.

**केतकी हरदास,**
**नागपूर**

## माता न तू वैरिणी !

'आ' म्हणजे आत्मा आणि 'ई' म्हणजे ईश्वर. या दोन अक्षरांपासून 'आई' हा शब्द बनतो. ईश्वराच्या आधीही कोणाचा मान असेल तर तो 'आई'चा आहे. आपल्या अपत्यासाठी जीवाचे रान करणाऱ्या, प्रसंगी प्राणाची बाजी लावणाऱ्या, सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या अनेक मातांच्या कथा आपण ऐकल्या आहेत आणि वाचल्या आहेत. प्रत्येकाच्या आयुष्यात आपल्या आईचे अनन्यसाधारण महत्व आहे; मात्र 'आई' सारख्या पवित्र शब्दाला काळिमा फासणाऱ्या घटना तामिळनाडू आणि मुंबई शहरात घडल्या. पोटच्या अल्पवयीन मुलीचे अश्लील व्हिडीओज बनवून ते इंटरनेटवर टाकून मुलीला वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडल्याप्रकरणी तामिळनाडू पोलिसांनी एका दाम्पत्याला अटक केली. मुलीच्या नकळत हे दाम्पत्य मुलीचे अश्लील व्हिडीओ बनवत होते. अशा अनेक अश्लील व्हिडीओ क्लिप्स या पालकांच्या मोबाईलमध्ये पोलिसांना सापडल्या आहेत. या नराधम आई वडिलांना पोक्सो कायद्याच्या अंतर्गत अटक करण्यात आली असून पुढील तपास चालू आहे. अशाच प्रकारच्या एका घटनेतील आरोपी आईला न्यायालयाने नुकतीच नऊ वर्षांची शिक्षा सुनावल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. या आईनेसुद्धा आपल्या अल्पवयीन मुलीला वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडले होते आणि त्यातून मिळणाऱ्या पैशातून ती स्वतःचा चरितार्थ चालवत होती. मातृत्वाच्या पवित्र नात्याला काळिमा फासणाऱ्या या घटना समाजात नैतिक मूल्यांचा किती मोठ्या प्रमाणात ऱ्हास झाला आहे हे दर्शवत आहेत. अशा प्रकारच्या घटना यापुढे घडायला नकोत यासाठी न्यायालयाने या मातांना कठोरात कठोर शासन करावे, जेणेकरून भविष्यात असे काही कुकृत्य करण्याचा विचारही कोणाच्या मनात येणार नाही.

**सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

## अशोकायन...

**यथा राजा तथा प्रजा..!**

बंदी सुभेदाराच्या सुनेला
पाहून वदले छत्रपती
अशीच आमची माता असती
तर आम्हीही .... !

खणा नारळाने भरून ओटी
केला तीचा सन्मान
रयतेला संदेश गेला
माना परस्त्री मातेसमान...

तोच का हा महाराष्ट्र माझा
जिथे भगीनी नाही सुरक्षित
दिवसा ढवळ्या बलात्काराच्या
घटना घडती अगणित ?...



प्रा. अशोक सारडा, मेहकर.
(९४२२३९४३३९)

# १८ फेब्रुवारीपासून तिडके महाविद्यालयाचे ग्राम नंदापुरी येथे रासेयो शिबीर

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १९ :

तिडके कला व वाणिज्य महाविद्यालय, रामटेक राष्ट्रीय सेवा योजना आयोजित हिवाळी निवासी शिबिर दिनांक 18 जानेवारी ते 24 जानेवारी 2025 पर्यंत ग्राम नंदापुरी येथे भारतीय संविधान अमृत महोत्सवी वर्ष या संकल्पनेवर आधारित आयोजित करण्यात येत आहे.

दिनांक 19 जानेवारी 2025 शिबिराचे उद्घाटन संपन्न होणार आहे उद्घाटक म्हणून मा. सौ वनिता मनोज नौकरकर सरपंच ग्राम नंदापुरी, अध्यक्ष आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद पोकळे आणि प्रमुख उपस्थिति म्हणून ज्ञानेश्वरी हटवार उपसरपंच, कृष्णाजी चापले, शशिकला कैलासजी मलेवार, रूखमांगत चापले, नीलिमा सूर्यकांतजी चापले रोशनी धनराजजी बंधाठे सौ अश्विनी स्वप्निल चापले , ग्रामसेवक, विनोद वरुडकर व निलेश लिल्लारे, पोलीस पाटील यावेळी उपस्थित राहणार आहे. दिनांक 20 जानेवारी 2025 रोजी प्रा. श्रीकांत भोवते यांचे संविधानातील लोकशाहीमूल्य या विषयावर व्याख्यान होणार आहे. दिनांक 21 जानेवारी 2025 रोजी प्रा. राजेश राठोड समताधूत, रामटेक यांचे वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर उद्बोधन होणार आहे . दिनांक 22 जानेवारी 2025 रोजी प्रा. संतोष जाधव, रामटेक यांचे राष्ट्रसंतांचे विचार व कार्य या विषयावर व्याख्यान होणार आहे.

दिनांक 23 जानेवारी 2025 रोजी बौद्धिक व मैदानी स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे आणि दिनांक 24 जानेवारी 2025 रोजी बक्षीस वितरण व समारोप कार्यक्रम संपन्न होणार आहे या कार्यक्रमाला ग्राम नंदापुरी येथील समस्त ग्रामवासी उपस्थित राहणार आहे. या शिबिरात शिबिरार्थी म्हणून महाविद्यालयाचे एकूण शंभर विद्यार्थी उपस्थित राहणार आहे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी ची भावना निर्माण व्हावी. श्रमाचे मूल्यं रुजावे आणि भारतीय संविधानाच्या तत्वलयाची अस्मिता समाज व विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होऊन, जागरूकता निर्माण व्हावी. या प्रामाणिक हेतूने शिबिराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख प्राध्यापक सुनील कठाणे यांनी केले आहे.

# गुंडाला केली चाकूसह अटक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १९ :

प्रतापनगर पोलिसांनी ठाण्यांतर्गत गस्तीदरम्यान एका गुंडाला चाकू घेऊन फिरताना अटक केली. अनिकेत रघुनाथ मेश्राम (24) रा. सुभाषनगर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

बुधवारी रात्री प्रतापनगर पोलिसांचे एक पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान संत तुकडोजीनगर झोपडपट्टीत एक तरुण शस्त्र घेऊन फिरत असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिस परिसरात दाखल झाले. सापळा रचून अनिकेतला ताब्यात घेतले. झडतीमध्ये त्याच्याजवळ मोठा चाकू मिळाला. तो काहीतरी गुन्हा करण्याच्या तयारीत फिरत असल्याचा संशय आहे. पोलिसांनी चाकू जप्त करून त्याला अटक केली.

# बेसा पिपळयात भाजपाच्या सदस्यता नोंदणी अभियानाला प्रतिसाद

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १९ :

भाजपामध्ये नव्या सदस्यांचा समावेश करून पक्ष अधिक बळकट करण्यास आम्ही वचनबद्ध असल्याचे प्रतिपादन माजी सरपंच नरेश भोयर यांनी केले. बेसा पिपळा नगरपंचायत क्षेत्रात रविवार १९ जानेवारी पासून 'घर घर चलो' अभियान राबविण्यात येत आहे.

या मोहिमेंतर्गत ते मार्गदर्शन करताना बोलत होते. या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या क्षेत्रात ६० ते ७० हजार सदस्य बनविण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले असून, त्यादृष्टीने बूथ प्रमुखांपासून पदाधिकारी, कार्यकर्ते कामाला लागले असल्याची माहीती माजी सरपंच नरेश भोयर यांनी दिली.



या प्रसंगी शक्ती केंद्र प्रमुख व माजी सरपंच नरेश भोयर याचे नेतृत्वात अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी चारुदत्त मोडक निखिल भोयर, विनोद कनोजिया, अमोल धनुष्कर, नितीन दाटकर, तुषार सलवटकर, महिंद्रा मार्शीगे, साहिल भोयर, संजय कावळे, देविदास खडीकर, राऊत, विक्की जोशी, नितीन निखारे,विनोद मोरे आदीसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

# एसटीच्या चालक, वाहकाने मद्यपान केल्यास कारवाई

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १९ :

एसटीच्या चालक, वाहकाने कर्तव्यावर असताना मद्यप्राशन केलेले नाही याची तपासणी करण्यासाठी विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे.

एसटी महामंडळाच्या चालक, वाहकाने मद्यपान केल्याचे आढळून आल्यास त्यांच्याविरोधात कडक कारवाई केली जाणार स्पष्ट निर्देश एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी दिले आहे.

एसटी महामंडळातील चालक, वाहकाने मद्यपान केलेले नाही याची खातरजमा करूनच त्यांना कर्तव्यावर पाठवणे गरजेचे आहे. एसटी महामंडळाच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार वाहतूक नियंत्रण कक्षातील वाहतूक नियंत्रकाने कर्तव्यावर जाणाऱ्या चालक, वाहकांनी केले नसल्याची खात्री करूनच त्यांना कर्तव्यावर पाठविणे बंधनकारक आहे. त्यामुळे विभागातील संशयित मद्यप्राशन करणाऱ्या चालक, वाहकांची तपासणी करण्यासाठी विशेष पथके करण्यात आली आहेत.

# रनाळा सरपंच पंकज साबळे दिल्लीला प्रजासत्ताकदिनी हजर राहणार

■ महासागर प्रतिनिधी, कामठी, दि. १९ :

२६ जानेवारी २०२५ प्रजासत्ताक दिनाच्या दिल्ली येथे आयोजीत मुख्य समारंभाला महाराष्ट्र राज्यातील राज्य सरकारच्या वतीने विशेष अतिथी म्हणुन कामठी तालुक्यातील रनाळा ग्राम पंचायतचे सरपंच पंकज विमल साबळे यांना कुटुंबा सह उपस्थीत राहण्याचे आमंत्रण मिळाले आहे.

या करिता पंकज साबळे यांनी म.रा. महसूल मंत्री व नागपुर जिल्ह्याचे पालक मंत्री चंद्रशेखर बावनकुळे साहेब व नागपुर जिल्हा परिषद आणि कामठी पंचायत समितीचे आभार मानले आहेत.

रनाळा सरपंच पंकज विमल नागोराव साबळे, पत्नी स्वाती पंकज साबळे यांना वरील कार्यक्रमात राजपथ न्यु दिल्ली येथे आयोजित प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणुन उपस्थीत राहण्याचे पत्र नागपुर जिल्हा परिषदचे मुख्य कार्यपालन अधिकारी विनायक महामुणी यांनी दिले आहे. पंकज साबळे यांनी केंद्र सरकारच्या घरोघरी जल योजना, प्रधान मंत्री आवास योजना, मिशन इंद्रधनुष्य, प्रधान मंत्री जनआरोग्य योजना, मातृ वंदन योजना, उज्वला ग्यास योजना , विश्वकर्मा योजना, प्रधान मंत्री पोषण आहार योजना सारख्या अनेक जन हिताच्या सफलतापूर्वक कार्यान्वित केल्या.

त्याचप्रमाणे नागपुर जिल्ह्यात विकासा करता सर्वात जास्त निधी ऊपलब्ध करण्यात सरपंच पंकज साबळे यांचा सिंहाचा वाटा आहे. दिल्लीच्या आमंत्रणामुळे पंकज साबळेचे रनाळा ग्राम पंचायतचे नागरिक व सर्व ग्राम पंचायत सदस्य तसेच कर्मचारी यांनी आभार व्यक्त केले.

# श्रीरामलला प्राण प्रतिष्ठा वर्षपुर्ती सोहळा द्वादशी महोत्सव थाटात साजरा



■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. १९ :

कन्हान शहरातील श्री हनुमान शिव पंचायत मंदिर, गांधी चौक येथे सकल हिंदू समाजाच्या तरुणांनी विविध कार्यक्रम आयोजित करून श्रीरामलला प्राण प्रतिष्ठा वर्षपुर्ती सोहळा द्वादशी महोत्सव थाटात साजरा केला.

गतवर्षी २२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्येत श्रीरामलला चा अभिषेक करून स्थापना करण्यात आली होती. त्या दिवशी देशभर आनंदोत्सव साजरे करण्यात आले होते. यावर्षी ११ जानेवारी २०२५ रोजी तिथीनुसार श्रीरामलला प्राण प्रतिष्ठा सोहळ्याचा पहिला वर्धापन दिन होता, त्यानुसार कन्हान मध्ये ह्या उत्सवाचा जल्लोष पाहायला मिळाला.

तिथीनुसार श्रीरामलला प्राण प्रतिष्ठा सोहळ्याच्या पहिला वर्धापन दिन निमित्ताने कन्हान येथे श्री हनुमान शिव पंचायत मंदिर परिसरात सकल हिंदू समाजाच्या तरुणांनी दिवे लावून दिपोत्सव साजरा केला. त्यानंतर फटाके फोडून आनंदोत्सव साजरा केला गेला. श्रीराम आणि हनुमानजीची विधिवत पूजा अर्चना करून महाआरती व हनुमान चालीसाचे पाठन केले गेले.

# पिपळा येथे श्रीरामलला प्राणप्रतिष्ठा वर्धापनदिन कार्यक्रम बुधवारी

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १९ :

पिपळा येथील देशगौरव प्रतिष्ठान तर्फे सह्याद्री कान्व्हेंटच्या मध्यवर्ती प्रांगणात अयोध्या येथील श्रीरामलला मूर्ति प्राणप्रतिष्ठा प्रथम वर्धापन दिनानिमित्त बुधवार २२ जानेवारी रोजी विविध धार्मीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

संध्याकाळी ४.३० वाजता श्रीरामलला प्रतिमेची पालखीसह शोभायात्रा, संध्याकाळी ५.३० वाजता शिवकालीन शस्त्र प्रात्याक्षिक, संध्याकाळी ६ वाजता ह.भ.प. चारुदत्त मोडक यांचे सुश्राव्य कीर्तन, संध्याकाळी ७ वाजता श्री समर्थ रामदास स्वामी महाराज यांच्या पवित्र पादुकांचे दर्शनार्थ आगमन आणि सत्कार समारंभ, उद्बोधन, रात्री ८ वाजता श्री. हनुमान चालिसा सामुहिक पठन व महाआरती, रात्री ९ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाला प्रमुख पाहूणे म्हणून महसूल मंत्री



चंद्रशेखर बावनकुळे, श्रीमंत डॉ. राजे मुधोजी महाराज भोसले, प्रमुख वक्ते सामाजिक, राजकीय विश्लेषक अॅड. मदन सेनाड, विश्व हिन्दू परिषद नागपूरचे मंत्री अमोल ठाकरे, माजी आमदार टेकचंद सावरकर, भाजपा नागपूर जिल्हाध्यक्ष सुधाकर कोहळे, बेसा पिपळाचे प्रशासक भारत नंदनवार, विधान सभाप्रमुख अजय बोढारे,डी.डी. सोनटक्के, माजी नगरसेवक भगवान मेंढे, पं.स. सदस्य वैशाली भोयर, माजी उपसरपंच प्रभुजी भेंडे, वनिता कावळे, अजय हातीबेड,किरण बोढारे,डॉ. राजुभाऊ टाकसाळे आमदार मोहन मते श्रीकांत आगलावे, योगेश्वरबुवा रामदासी श्रीराम कुळकर्णी, राजेन्द्र राजूरकर, प्रकाश वाघमारे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन देशगौरव प्रतिष्ठान पिपळाचे अध्यक्ष नरेश भोयर यांनी केले.

# राज्यमंत्री जयस्वाल यांनी विकास कामाची पाहणी करुन घेतला आढावा

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १९ :

रामटेक शहरातील विकास कामाबाबत आढावा बैठक दि.१७ जानेवारी २०२५ ला नागार्जुन विश्रामगृह रामटेक येथे राज्य मंत्री अॅड. आशिष जयस्वाल यांच्या अध्यक्षेखाली घेण्यात आली.



सदर बैठकीत गडमंदिर येथिल विकास कामे, अंबाडा येथिल विकास कामे, नेहरु मैदान येथिल विकास कामे व रामटेक शहरातील अनेक मंजूर व प्रगतिपथावरील कामाबाबत आढावा घेण्यात आला. मंजूर आसलेल्या कामांची तात्काळ निविदा प्रक्रिया पूर्ण करून कामे सुरु करण्याचे तसेच प्रगतीपथावरील कामे उत्तम दर्जाची करण्याबाबत कंत्राटदार व अधिकारी यांना निर्देश देण्यात आले. जयस्वाल यांनी सर्व विभागातील अधिकाऱ्यांसोबत गडमंदिर, अंबाडा व शहरातील विविध विकास कामांच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देऊन कामांचा आढावा घेतला. यावेळी उपविभागीय अधिकारी प्रियेश महाजन, तहसिलदार पुनम कदम,उपविभागीय पोलिस अधिकारी रमेश बरकते, गट विकास अधिकारी जयसिंग जाधव,सार्वजानिक बांधकाम विभागाचे किरण पोकळे, मुख्याधिकारी नितिन लुंगे, विद्युत विभागाचे अभियंता गिरीश मडामे, पुरातत्व विभागाचे मयुरेश खडके, निरज तिवारी,पोलिस निरीक्षक शेटे,शिवसेना रामटेक शहर प्रमुख राजेश किंमतकर उपस्थित होते.

# नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या पाच आरोपी विरूद्ध गुन्हा दाखल

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. १९ :

कन्हान पोलीसांनी प्रतिबंधीत नायलॉन मांजाची विक्री आणि वापर करणाऱ्या पाच आरोपी विरूद्ध गुन्हा दाखल करून एकुण २,५५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

प्राप्त झालेल्या माहिती नुसार सोमवार (दि.१३) ते मंगळवार (दि.१४) जानेवारी ला उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष गायकवाड यांचा आदेशानुसार आणि पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा नेतृत्वात कन्हान पोलीस नॉयलान मंजा कारवाई करने कामी परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाली कि काही इसम नॉयलान मंजाचा वापर करुन पतंग उडवत आहे. अश्या माहिती वरुन पोलीसांनी सदर ठिकाणी जाऊन पाहणी केली असता काही इसम नॉयलान मंजाचा वापर करुन पतंग उडवतांना दिसुन आले . पोलीसांनी आरोपी १) सुरज विठ्ठल वानखेडे , २)संजय सारटकर , ३) विधी संघर्ष बालक ४) बंटी ऊर्फ रोहित किशनलाल शर्मा , ५) विनोद देवाजी येलमुले सर्व राहणार कन्हान यांना ताब्यात घेऊन त्यांचा जवळुन २,५५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी कन्हान पोलीस स्टेशन येथे पाच आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा मार्गदर्शनात कन्हान पोलीस करीत आहे.

सदरची कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष गायकवाड यांचा मार्गदर्शनात, पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील, सहायक पोलीस निरीक्षक राहुल चव्हान, हरिष सोनभद्रे , महेश बिसेन, अमोल नागरे, अश्विन गजभिए, आकाश सिरसाट, सम्राट वनप्रती, अनिल यादव सह आदि पोलीस कर्मचारी यांनी ही कारवाई यशस्वीरित्या पार पाडली.

# आमदार मेघेंचा सत्कार



■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. १९ :

श्रीक्षेत्र हनुमान गड देवस्थान कमिटी हिंगण्याच्या वतीने तिळी चतुर्थी निमित्त यात्रेसाठी दर्शनासाठी आलेले आमदार समीर मेघे यांचा सत्कार कमिटीचे अध्यक्ष माजी आमदार सुधाकर देशमुख यांनी शाल व श्रीफळ देऊन केला.

यावेळी नगराध्यक्ष लता गौतम, सरपंच उमेश आंबटकर, नगरसेविका छाया भोसकर, विशाल चामटे, ज्ञानेश्वर भोसकर,सचीन कोल्हे, विकास दाभेकर,मंदिर कमिटीतील उपाध्यक्ष बाबाराव भोसले, सचिव ह.भ.प. भीमराव कोठे महाराज, सहसचिव गिरीश धोटे, कोषाध्यक्ष शिरीष देशमुख, सदस्य आनंद बंग, विठ्ठल मणियार, पांडुरंग कोठे, दामोदर घोडे, शंकर शिवरकर, पुरुषोत्तम देशमुख,नारायण चिडे, विठ्ठल कोहाड,आश्विन दारव्हेकर कोठीराम बनसुले,भूषण कराळे, धनराज कोठे, स्वप्निल दैने उपस्थित होते.

आमदार मेघे यांनी देवस्थान कमिटीचे आभार मानले. मंदिराच्या विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. सर्व गणेश भक्तांनाही आमदार मेघे यांनी शुभेच्छा दिल्या.

**मा. दिवाणी न्यायाधीश, क स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद**

दिवाणी कि. अर्ज क्र. २२८/२०२४ नि.
अर्जदार:-१) अंजनाबाई अर्जुन उइके, वय-५२ वर्ष धंदा-घरकाम रा. निंभोरा, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद
२) छाया जितेंद्र मडावी, वय-३३ वर्ष धंदा-घरकाम रा.प्लॉट नं.३९, वार्ड नं.६, नवजीवन कॉलनी, वनाडोंगरी, नागपूर.

-: विरुध्द :-

गैरअर्जदार :- कोणीही नाही

प्रकरण:- वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी अॅड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ यांचे वडील कै. अर्जुन शंकर उइके यांचा दिनांक-२७.०४.२०२३ रोजी मौजे निंभोरा ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ व २ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ व २ हे कै. अर्जुन शंकर उइके यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ व २ यांना वारस प्रभाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आते या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ व २ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील तारीख ०३.०२.२०२५. आज दि. ०४.०१.२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

| विभागीय लिपीक | सहाय्यक अधीक्षक |
| --- | --- |
| दिवाणी न्यायालय | दिवाणी न्यायालय |
| क - स्तर सोयगांव | क - स्तर सोयगांव |

# श्री सद्गुरू दत्त आयटीयात अग्निशमन प्रशिक्षण



■ महासागर प्रतिनिधी,
कुही, दि. १९ :

स्व. मधुकरराव देशमुख शिक्षण संस्था नागपूर द्वारा संचालित कुही येथील श्री सद्गुरु दत्त खाजगी आयटीआय येथे अग्निशमन प्रशिक्षण व आपत्ती व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. धम्मचक्र (सोनू) मेश्राम यांनी प्रशिक्षणार्थ्यांना आग विझविण्याबद्दल मार्गदर्शन केले. फायर एक्सटिंगुशर अग्नीशामक यंत्राद्वारे आग कशी विझवावी यांची प्रात्यक्षिक करून दाखविले. आग लागल्यानंतर उपाय योजनेची विस्तृत माहिती दिली. कार्बन डायऑक्साईड सिलेंडर हे सर्व प्रकारची आग विझविण्यासाठी वापरतात. कोरडी रासायनिक पावडर ही इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांची आग विझविण्यासाठी वापरावी. वाळू ही इलेक्ट्रॉनिक्स आणि गॅसची आग विझविण्यासाठी उपयुक्त ठरते.

हायड्रो सिस्टिममध्ये इमारतीच्या चारही बाजूंनी पाईपद्वारे प्रत्येक मजल्यावर पाण्याचा मारा केला जातो. आग कोणत्या प्रकारची आहे, यावरून ही आग विझविण्यासाठी योग्य त्या साधनांचा वापर करणे आवश्यक असल्याचे मेश्राम यांनी सांगितले. दुर्घटनेतील व्यक्तींना प्राथमिक उपचार कोणते करावेत, त्यांना बाहेर कोणत्या पद्धतीने काढावे, याचेही प्रात्यक्षिक त्यांनी दाखविले.

प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष नितीन देशमुख, उपाध्यक्ष सौ. नम्रता देशमुख, संस्थेचे कार्यवाह दिनेश देशमुख, आयटीआय प्राचार्य विद्यानंद देशमुख, वीजतंत्री निदेशक दिनेश मेश्राम, जोडारी निदेशक सागर बल्की, शिक्षकवृंद शुभांगी जिचकार, नलिनी देशमुख, अमोल पालेकर, गणेश देशमुख, परिचारक शांताराम बाविस्कर उपस्थित होते.

# रा.से.यो. विशेष श्रमसंस्कार शिबीराचे ऊद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी,
कुही, दि. १९ :

येथील राणी इंदिराबाई भोसले महाविद्यालयाचे रा.से.यो. विशेष श्रमसंस्कार शिबीराचे ऊद्घाटन ग्राम मांगली येथे ऊत्साहात संपन्न झाले.



प्रसंगी ऊद्घाटक म्हणून मा.आ. संजय मेश्राम तर अध्यक्षस्थानी ग्रा.वि.शि.मं.चे अध्यक्ष एच. जी. नागमोते, विशेष ऊपस्थीती संस्थेचे कोषाध्यक्ष डि.डि. जेठे होते. प्रारंभी महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमेला दिप प्रज्वलित करून अभिवादन करण्यात आले. विद्यापीठ गीताने ऊद्घाटन सोहळ्याचा प्रारंभ करण्यात आला. प्रास्ताविक व पाहूण्यांचा परीचय प्राचार्य गजानन मांडेकर यांनी करून दिला.

ऊद्घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करतांना शिबीरार्थी विद्यार्थ्यांना "आपले ध्येय मनाशी निश्चित करून पुढे जा, आत्मविश्वास दृढ असेल तर अशक्यही शक्य होईल. आधुनिक ज्ञान तंत्रज्ञानाला ओळखा काळासोबत नव्या बदलाशी नाळ जोडा. समाजाला जवळून ओळखायला आपली निरीक्षण शक्ती सुक्ष्म व संवेदनक्षम असु द्या". असे मोलाचे विचार आ. संजय मेश्राम यांनी ऊद्घाटन प्रसंगी व्यक्त केले.

मान्यवर पाहूण्यांसोबत गट ग्रा.पं. माळणी सरपंच भाष्कर सहारे, ऊपसरपंच सीमा सेलोकर, माजी सरपंच प्रभाकर धांडे, प्रा.डॉ. रमेश चौधरी, अमित मांडवे ऊपस्थीत होते. महाविद्यालयातील प्राध्यापक कार्यालयीन कर्मचारी व ग्रामस्थ यांची बहूसंखेने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रुती तलवारे तर आभारप्रदर्शन साक्षी लांजेवारने केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# कॅलिडोस्कोप



## अभिषेकाची धारा

*अभिषेकाची धारा*
*विझून एक अग्निकुंड*
*धग शमली धरणीची*

*वाऱ्यासवे तरंगत आली*
*फौज काळ्या मेघांची*

*आता अभिषेकाची धारा*
*कोसळत राहणार धरेवर*

*आडोशाआडून निरखावी*
*पाऊस झेलत पापण्यांवर*

## गूढरम्य 'मिरनी माईन'

सायबेरियाच्या पूर्व भागात 'मिरनी माईन' ही जगातली सर्वात मोठी हिऱ्याची खाण आहे. या खाणीतल्या हिऱ्यांची संख्या प्रचंड आहे. यातून खूप मोठ्या प्रमाणावर हिरे काढले जातात. ही खाण १७२२ फूट खोल आणि ३९०० फूट रुंद आहे. 'मिरनी माईन' हा जगातला दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा मानवनिर्मित खड्डा आहे. रशियन भूगर्भशास्त्रज्ञांनी १३ जून १९५५ या दिवशी या खाणीचा शोध लावला. या शोधासाठी युवी खबरदीन या शास्त्रज्ञाला १९५७ मध्ये लेनिन पुरस्काराने गौरवण्यात आलं. या खाणीच्या विकासकामाला १९५७ पासून सुरूवात झाली. वर्षातला बराच काळ या भागातलं वातावरण खराब असतं. हिवाळ्यात तर इथलं तापमान खूप खाली घसरतं. गाड्यांमधलं इंधनही या काळात गोठलेलं असतं. या खाणीच्या खोदकामात जेट इंजिन आणि डायनामाइट्सचा वापर केला होता. या खाणीच्या शोधानंतर हिरे उत्पादनात रशिया तिसऱ्या स्थानी आला. ही खाण खूप मोठी आणि खोल आहे. त्यामुळे यावरून जाणारी हेलिकॉप्टर्स हवेच्या दबावामुळे खड्ड्यात सामावली आहेत. अशा काही घटनांनंतर या भागावरून हेलिकॉप्टरच्या उड्डाणाला बंदी घालण्यात आली. २०११ नंतर या खाण पूर्णपणे बंद करण्यात आली आहे.



## अंधश्रद्धेतून जीभ कापून शंकराला अर्पण!

श्रद्धा आणि अंधश्रद्धा यात फरक आहे. देशात अनेक मृत्यू केवळ अंधश्रद्धेमुळे होतात. असेच एक प्रकरण छत्तीसगडमधून समोर आले. तिथे अकरावीत शिकणाऱ्या एका विद्यार्थिनीने तिची जीभ कापून ती भगवान शिवाला अर्पण केली. ही बाब घरातील सदस्यांना आणि परिसरातील लोकांना समजताच सर्वत्र तणावाचे वातावरण निर्माण झाले. छत्तीसगडमधील सक्ती जिल्ह्यातील देवरघाचा गावातील आचरिपाली येथे भगवान शंकराची पूजा करताना १६ वर्षाच्या मुलीने आपल्या जिभ कापून ती शंकराला वाहिली. यानंतर विद्यार्थिनीने स्वत:ला मंदिरात कैद केले आणि ती देवपूजेत मग्न झाली. ही बाब लोकांना समजताच पोलिसांना कळवण्यात आले; मात्र गावकऱ्यांनी पोलिसांना मंदिरात जाण्यापासून रोखले. मुलगी मंदिरात भक्तीमध्ये मग्न असल्याचे कुटुंबीय आणि ग्रामस्थांचे म्हणणे होते. त्यानंतर वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी आले तेव्हा ग्रामस्थांनी मंदिराला चारही बाजूंनी घेराव घातला आणि मुलीला रुग्णालयात नेण्यास नकार दिला.



अंधश्रद्धेपोटी एखाद्याने असे पाऊल उचलण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधी वाराणसीच्या गायघाट कोतवाली पोलिस ठाण्यांतर्गत एक धक्कादायक घटना घडली. देवी कालीवर अपार श्रद्धा असलेल्या पुजाऱ्याने दर्शन न मिळाल्याने स्वतःची मान कापली. यानंतर पुजाऱ्याला रक्तस्त्राव होत असल्याचे पाहून कुटुंबीयांनी त्याला तातडीने ट्रॉमा सेंटरमध्ये नेले, तेथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

## करोडोची संपत्ती, तरी 'मोफत'ची सवय!

प्रत्येक व्यक्ती लहानपणापासूनच यशस्वी होण्याचे स्वप्न पाहत असते. चांगली रक्कम मिळेल, तेव्हा मोकळेपणाने खर्च करू शकेल, अशी त्याची मानसिकता असते; मात्र काही लोक वेगळे असतात. ते श्रीमंत होऊनही आपले आयुष्य कंजूषपणे घालवतात. अशाच एका व्यक्तीची गोष्ट चर्चेत आली. ती आपल्या अनोख्या जीवनशैलीमुळे लोकांमध्ये चर्चेत आहे. त्यांचे नाव आहे, ७५ वर्षीय जपानी दिग्गज हिरोतो किरितानी. त्यांच्याकडे करोडोंची संपत्ती आहे; परंतु असे असूनही ते दररोज कूपन आणि मोफत ऑफरचा लाभ घेतात आणि त्यांचे जीवन जगतात. किरीतानी हा जपानी बुद्धिबळसारखा खेळ असलेल्या शोगीचा व्यावसायिक खेळाडू होता. शेअर बाजारातील एका सिक्युरिटीज फर्ममध्ये शिक्षक म्हणून त्यांनी आपल्या करिअरची सुरुवात केली. येथून त्यांनी व्यापाराचे कौशल्य शिकले आणि २०२४ पर्यंत त्याची संपत्ती ६० कोटी येन (३१.५ कोटी रुपये) पर्यंत वाढली. एवढा पैसा असूनही कोणी कंजूष कसा असू शकतो, असा प्रश्न कुणालाही पडेल. २००८ मध्ये शेअर बाजारातील घसरणीनंतर त्याला २० कोटी येनचे नुकसान सहन करावे लागले होते. त्यानंतर किरीतानी ठरवले, की आता एक पैसाही वाया जाणार नाही. यासाठी त्यांनी १,००० हून अधिक कंपन्यांचे शेअर्स खरेदी केले आणि त्यांची कूपन आणि शेअरहोल्डरचे भत्ते वापरण्यास सुरुवात केली. काही जपानी कंपन्या त्यांच्या भागधारकांना सवलत कूपन, मोफत उत्पादन नमुने, मोफत तिकिटे, भेटवस्तू, बोनस आणि कंपनीच्या कार्यक्रमांना उपस्थित राहण्याची संधी देतात. यामुळे कंपनीच्या गुंतवणूकदारांची निष्ठा राखण्यात मदत होते. याचा फायदा घेत किरीतानी सकाळी लवकर आपली सायकल काढतात. मोफत जेवण गोळा करायला सुरुवात करतात. ते जिममध्ये मोफत व्यायाम करतात आणि मोफत मूव्ही तिकिटांद्वारे दरवर्षी १४० चित्रपटही पाहतात. किरीतानी सांगतात, की आता माझ्या आयुष्याचा योग्य उद्देश कूपन वापरणे हा झाला आहे.



## मॅचसाठी १४ हजार किलोमीटरची वारी!




फुटबॉल हा एक असा खेळ आहे ज्याचे जगभरात लाखो चाहते आहेत. त्याच वेळी, इंग्लिश प्रीमियर लीग (ईपीएल) बद्दल चाहत्यांच्या उत्कटतेला आणि समर्पणाला मर्यादा नाही. अलीकडेच, मँचेस्टर युनायटेडचा उत्कट चाहता असलेल्या ओचिरवानी बॅटबोल्डने त्याच्या आवडत्या क्लबचा सामना पाहण्यासाठी मंगोलिया ते ब्रिटन असा १४ हजार किलोमीटरचा सायकलवरून प्रवास करून हे सिद्ध केले. तथापि, २६ वर्षीय बॅटबोल्डच्या सायकलिंग प्रवासामागील प्रेरक शक्ती केवळ फुटबॉल सामन्याची आवड नव्हती, तर ते एक वैयक्तिक मिशनदेखील होते.

त्याने त्याच्या लहानपणी त्याच्या आईला वचन दिले होते, की तो तिला एक दिवस मँचेस्टर युनायटेड सामना पाहण्यासाठी घेऊन जाईल. बॅटबोल्डने ५ मे २०२३ रोजी मंगोलिया येथून सायकलिंगचा प्रवास सुरू केला आणि उझबेकिस्तान, तुर्कमेनिस्तान, इराण, तुर्की, बल्गेरिया, उत्तर मॅसेडोनिया, कोसोवो, सर्बिया, हंगेरी, ऑस्ट्रिया, जर्मनी आणि फ्रान्स मार्गे मँचेस्टर, ब्रिटन गाठले. त्याने एक्सवर फुटबॉल सामन्यादरम्यान त्याच्या आईसोबत काढलेला एक फोटो शेअर केला आणि लिहिले, मी ओल्ड ट्रॅफर्ड येथे माझा पहिला सामना पाहण्यासाठी मंगोलिया ते मँचेस्टरपर्यंत सायकल चालवली. तो पुढे म्हणाला, की मँचेस्टरवर माझे किती प्रेम आहे याचा हा पुरावा आहे. बॅटबोल्डने २०१० पासून क्लबला पाठिंबा देण्यास सुरुवात केली. या जबरा चाहत्याने क्लबला पत्र लिहिले, मँचेस्टर हा माझा आवडता संघ आहे आणि मी घरून (मंगोलिया) सायकलने मँचेस्टरला निघालो आहे.

## वरमाला घालताना प्रेयसीची वराला लाथ!

असं म्हणतात की पहिलं प्रेम नक्कीच परत येतं, मग ते लग्नपत्रिका द्यायला येतं किंवा लग्न बिघडवायला येतं; पण ते नक्कीच येतं. एका लग्नसमारंभात एक वर आपल्या वधूला हार घालत असताना त्याची प्रेयसी मागून येते आणि त्याला लाथ मारून पडते आणि बघता बघता मारामारी सुरू होते.

लग्नाच्या थाटामाटात वराची मैत्रीण स्टेजवर आल्यावर एकच गोंधळ उडाला. या वेळी वर आपल्या वधूला हार घालत होता; मात्र प्रेयसीने पाठीमागून येऊन वराला लाथ मारली. जणू ती म्हणत होती, की प्रेमात फसवणूक करून आपण दुसऱ्याचे होऊ शकत नाही. एका लग्न समारंभात झालेल्या गोंधळामुळे सर्व पाहुणे आश्चर्यचकित झाले. वराच्या मैत्रिणीने अचानक स्टेजवर चढून सर्वांसमोर वराला लाथ मारली. मंचावर वर वधूला हार घालण्यासाठी जात असताना ही घटना घडली. गर्दीतून एक महिला स्टेजवर आली आणि तिने काहीही न बोलता वराला लाथ मारली. ही घटना तिथे उपस्थित सर्वांसाठी धक्कादायक होती. एका महिलेने वराला उचलले आणि त्यानंतर वाद सुरू झाला. वर त्याच्या कथित प्रेयसीवर वर्चस्व गाजवताना दिसला, तर कथित प्रेयसीने त्याला डोळा मारून धमकी दिली.



## अंतराळात तयार झाली बिस्किटं!



अंतराळातलं आकर्षण अद्यापही कमी झालेलं नाही. अंतराळात यानं पाठवली जात असली, अंतराळवीरांकडून बरीच माहिती मिळत असली तरी इथे दडलेली अनेक गुपितं अजूनही उलगडलेली नाहीत. म्हणूनच अंतराळात मायक्रोवेव्ह ओव्हन पाठवण्यात आला. अंतराळ स्थानकात पाठवल्या जाणाऱ्या या ओव्हनचं कार्य यावेळी तपासलं गेलं. अंतराळवीरांनी या ओव्हनमध्ये बिस्किट बनवली. अंतराळातल्या शून्य गुरूत्वाकर्षणात बिस्किटं बेक होण्याची प्रक्रिया कशी पार पडते, याचा अभ्यास या निमित्ताने करण्यात येणार आला. अंतराळयानात कृत्रिम पद्धतीने पृथ्वीसारखं वातावरण तयार केलं जातं. त्यामुळे मायक्रोग्रॅव्हिटीमध्ये बिस्किट तयार होण्याची प्रक्रिया नेमकी कशी होते, हे जाणून घेणं उत्सुकतेचं ठरलं. त्यातच अंतराळातल्या या बिस्किटांच्या चवीबाबतही कुतुहल निर्माण झालं. झीरो जी किचन आणि डबल ट्री बॉय हिल्टन या कंपन्यांनी मिळून हा ओव्हन तयार केला. अंतराळात बनवलेल्या बिस्किटांमुळे शास्त्रज्ञांना बरीच माहिती मिळाली.

## शहाळ्यावर अवतरल्या ऐतिहासिक वास्तू

इंदूरमधल्या गजेंद्र शर्मा नावाच्या तरुणाने शहाळ्यावर अनोख्या कलाकृती साकारल्या आहेत. त्याने जगभरातल्या महत्त्वाच्या ऐतिहासिक वास्तूंनी ही शहाळी सजवली आहेत. गजेंद्र बीएससीच्या पहिल्या शेवटच्या वर्षाला असून त्याच्या या कामगिरीची दखल विविध रेकॉर्ड बुक्सनी घेतली आहे. फक्त दोन दिवसात त्याने शहाळ्याच्या कवचावर ५१ कलाकृती साकारल्या. यासाठी त्याला फक्त ७२ रुपये खर्च आला. 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्डस' आणि 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्डस'मध्ये त्याच्या या विक्रमाची नोंद करण्यात आली आहे. गजेंद्रने सर्वप्रथम फेब्रुवारीमध्ये शहाळ्याच्या कवचावर लाल किल्ल्याचं चित्र काढलं. त्यानंतर तो थांबला नाही. कुतुबमिनार, हवा महल, चीनची भिंत, ताज महालासह युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीतल्या ५१ वास्तू त्याने रेखाटल्या. त्याच्या या अनोख्या कलाकृतींचं प्रदर्शन होळकर विज्ञान महाविद्यायात भरवण्यात आलं होतं. यावेळी अनेकांनी गजेंद्रचं तोंड भरून कौतुक केलं. 'इंडिया बुक्स ऑफ रेकॉर्डस'मध्ये 'मॅक्झिमम वर्ल्ड हेरिटेज स्केच्ड ऑन वेस्ट कोकोनट शेल' या शीर्षकाअंतर्गत त्याची ही कामगिरी नोंदवण्यात आली आहे.



## पाण्याने तळ गाठला आणि...

अचानक लागलेला एखादा शोध आपल्याला थक्क करून सोडतो. अशा शोधांमधून प्राचीन काळातली काही गुपितं उघड होऊ शकतात. असाच एक शोध इराकमधल्या कुर्दिस्तान भागात लागला आहे. इथल्या एका जलाशयातल्या पाण्याने तळ गाठला आणि पाण्याच्या पोटात सामावलेली एक इमारत लोकांना दिसली. ही इमारत बघून सर्वांचेच डोळे पांढरे झाले. ही इमारत जवळपास ३४०० वर्षांपूर्वीची असल्याचं बोललं जात आहे. टिगरिस नदीवर बांधलेल्या मोसूल धरणातलं पाणी कमी झाल्यामुळे ही इमारत दिसू लागली. या शोधाचं श्रेय कुर्दीश-जर्मन संशोधकांना द्यायला हवं. पुरातत्त्व विभागाला २०१० मध्ये या परिसराची माहिती मिळाली होती. मात्र त्यावेळी खोदकाम करता आलं नाही. या जलाशयात ३४०० वर्षं जुन्या महालाचे अवशेष सापडले आहेत. प्राचीन काळात इराकमध्ये मित्तानी साम्राज्य होतं. हा महाल याच काळातला असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. या महालाची रचना अनोखी असल्याचं शास्त्रज्ञ सांगतात. खोदकामादरम्यान महालात लाल आणि निळ्या रंगाची काही चित्रंही सापडली आहेत. हा महाल ६५ फूट उंच असल्याचा तर्क लढवला जात आहे. महालात काही दगडही सापडले असून त्यावर काही मजकूरही आढळला आहे. या दगडांना क्युनिफॉर्म टॅबलेट असं म्हणतात. क्युनिफॉर्म ही प्राचीन लेखनशैली असल्याचं शास्त्रज्ञ सांगतात. मजकूर जाणून घेण्यासाठी हे दगड जर्मनीला पाठवण्यात आले आहेत. मित्तानी साम्राज्याबद्दल फारसं संशोधन झालेलं नाही. मात्र या महालामुळे काही गोष्टी उजेडात येण्याची शक्यता आहे.



## इथे होत नाही चढाई

'माउंट एव्हरेस्ट' हे जगातलं सर्वात उंच पर्वतशिखर आहे. आजवर अनेकांनी हे शिखर सर करण्याची कामगिरी करून दाखवली आहे. काही दिवसांपूर्वी 'माउंट एव्हरेस्ट'वर गिर्यारोहकांची खूप गर्दी झाली होती. त्यामुळे जगातल्या या सर्वात उंच शिखरावर 'ट्रॅफिक जाम'सारखी परिस्थिती उद्‌भवली होती. गिर्यारोहक जगातल्या विविध शिखरांवर चढाई करतात. मात्र एव्हरेस्टपेक्षा कमी उंचीच्या एका पर्वतावर अजूनही कोणी चढलेलं नाही. 'गंगखार पुनसुम' असं या पर्वताचं नाव आहे. भूतान आणि चीन या दोन देशांच्या मध्यभागी वसलेल्या या पर्वताची उंची २४,८४० फूट आहे तर माउंट एव्हरेस्ट २९,०२९ फूट उंच आहे. या पर्वतमाथ्यावर चढण्याचे काही प्रयत्न झाले. १९९४ मध्ये भूतानने चीनच्या मदतीने गिर्यारोहकांचा हा प्रयत्न हाणून पाडला. याचं कारण म्हणजे भूतानचे लोक पर्वताला देवासमान मानतात. त्यामुळे 'गंगखार पुनसुम' पर्वत त्यांच्यासाठी पवित्र स्थळ आहे. त्यामुळे या पर्वतावर चढाई करायला बंदी घालण्यात आली. भूतान सरकारने १९९४ मध्ये एक कायदा केला. त्यानुसार भूतानमध्ये २० हजार फुटांपेक्षा अधिक उंचीच्या पर्वतांवर चढायला बंदी आहे.



